महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

## सन १८७४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३

# महाराष्ट्र वंशपरंपरागत पद अधिनियम

(दिनांक ३१ जुलै, २०१५ पर्यंत सुधारित)

## Mumbai Act No. III of 1874

# The Maharashtra Hereditary Offices Act

( As modified upto 31st July, 2015 )

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित.

२०१५

[किंमत रु. १७.००]

(सन १८७४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३)

# महाराष्ट्र वंशपरंपरागत पद अधिनियम

## अनुक्रमणिका

### विभाग १

### प्रारंभिक

प्रस्तावना


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | लघु संज्ञा. .. .. .. | २ |
| २. | [रद्द केले.] .. .. .. | २ |
| ३. | भाग ६, ७, ८ व ९ लागू असणे. .. .. .. | २ |
| ४. | अर्थ विवरणात्मक कंडिका. .. .. .. .. | २ |


### विभाग २

### वतनी मालमत्ता आणि तीवरील उत्पन्न


| | | |
|---|---|---|
| ५. | वतन व वतनावरील हक्क दुमाला करुन देण्यास प्रतिबंध. .. .. | ३ |
| ६. | कलेक्टरास वतनाच्या संरक्षणासाठी वैध कारवाई करण्याचा अधिकार असणे. | ४ |
| | कलमे ८ ते ११ किंवा कलम १३ अन्वये काम चालविण्याचा अधिकार कलेक्टरास आहे. | ४ |
| ७. | पारिश्रमिक म्हणून नेमून दिलेले वतन मंजुरीवाचून दुमाला करता येणार नाही. .. | ५ |
| ८. | वहिवाटदाराखेरीज इतर इसमाच्या कब्जांत गेलेली वतनी मालमत्ता, वहिवाटदाराला पारिश्रमिकाचे अंशदान देण्यास पात्र असेल. | ५ |
| ९. | वतनी मालमत्तेचे अन्य संक्रमण हे विवक्षित परिस्थितीत रद्द आणि निरर्थक आहे असे जाहीर करण्याचा कलेक्टरास अधिकार असणे. | ५ |
| | कलेक्टरास जमिनीच्या बाबतीत पूर्ण खंड वसूल करण्याचा अधिकार असणे | ६ |
| १०. | वहिवाटदाराचे पारिश्रमिक म्हणून सोपवून दिलेल्या वतनी मालमत्तेवरील जप्ती, कलेक्टराचे प्रमाणपत्र मिळाल्यावर, दिवाणी न्यायालयाने उठवावी. | ६ |
| ११. | हा अधिनियम संमत झाल्यानंतर वतनी मालमत्तेचे अन्य संक्रमण हे रद्द आणि निरर्थक आहे असे कलेक्टरने जाहीर करणे. | ७ |
| ११अ. | कलम १० किंवा कलम ११ अन्वये दिलेला आदेश ज्या मालमत्तेस लागू असेल ती परत घेणे. | ७ |
| १२. | कलमे ८, ९ आणि ११ चे उपबंध अंमलात आणण्याच्या कामी कलेक्टराचे अधिकार. | ७ |
| १३. | पारिश्रमिक म्हणून सोपवून दिलेले वतन न्यायालयाच्या आदेशिकेस पात्र नसणे. | ८ |
| १४. | वंशपरंपरागत पदांचे गट करणे. .. .. .. | ८ |

## विभाग ३

### वतनांचे मोबदले


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १५. | चाकरीबद्दल मोबदला. .. .. .. | ८ |
| | तडजोड कोणावर बंधनकारक असेल. .. .. .. | ८ |
| | "धारण करणारा" म्हणजे कोण. .. .. .. | ८ |
| १६. | ग्रामसेवकांकडून वहिवाटीनुसार चालत आलेली चाकरी घेण्याच्या व्यक्तिंच्या हक्कांस बाध न येणे. | ८ |
| १७. | दुमाला गावातून आकारणीची रक्कम देणे. .. .. .. | ९ |
| १८. | विवक्षित वर्गाच्या वतनदारांचे हक्क आणि कर्तव्ये मर्यादित करण्यासाठी पंचायतीची नेमणूक करणे. | ९ |
| १९. | वतनाचे उत्पन्न कमीजास्त होण्याच्या बाबतीत देणे असलेली रक्कम ठरविण्याची पध्दत. | ९ |
| २०. | हा अधिनियम संमत होण्यापूर्वी केलेल्या तडजोडीचे वैधकरण. .. .. | १० |
| २१. | राज्य सरकार निदेश देईल अशा मुदतीसाठी तडजोड करणे. .. .. | १० |


## विभाग ४

### नवीन वतने करणे व जुनी वतने रद्द करणे


| | | |
|---|---|---|
| २२. | नवीन वतने करणे. .. .. .. | १० |


## विभाग ५

### वहिवाटदारांचे पारिश्रमिक


| | | |
|---|---|---|
| २३. | वहिवाटदारांची उपलब्धी कलेक्टरने ठरवावी. .. .. .. | १० |
| | कलेक्टराला या कारणासाठी वतनी मालमत्ता सोपवून देण्याचा अधिकार आहे. | १० |


## विभाग ६

### प्रातिनिधिक वतनदार


| | | |
|---|---|---|
| २४. | प्रातिनिधिक वतनदारांनी पदासंबंधीची कर्तव्य बजाविणे. .. .. | ११ |
| २५. | प्रातिनिधिक वतनदार ठरविणे व त्यांची नोंदणी करणे. .. .. | ११ |
| २६. | प्रातिनिधिक वतनदार कोण हे ठरविताना पूर्वीचा प्रघात विचारात घेणे. .. | ११ |
| २७. | एकमेव प्रातिनिधिक वतनदार म्हणून कुटुंब प्रमुखांचे नाव नोंदणे. .. | ११ |
| २८. | प्रातिनिधिक वतनदार म्हणून कुटुंबांच्या प्रमुखांची नावे नोंदवावी. .. .. | ११ |
| २९. | ज्येष्ठ कुटुंबाच्या प्रमुखाचे नाव एकमेव प्रातिनिधिक वतनदार म्हणून नोंदणे. .. | ११ |
| | प्रातिनिधिक वतनदार म्हणून भिन्न कुटुंबांच्या प्रमुखांची नावे नोंदणे. .. | १२ |
| ३०. | एकत्रित वतनांतील प्रत्येक कुटुंबातील प्रमुखांचे नाव प्रातिनिधिक वतनदार म्हणून नोंदणे. | १२ |
| ३१. | प्रातिनिधिक वतनदार कोण याबद्दल कुटुंबाचे प्रमुख कबूल होतील तेव्हा अनुसरावयाची कार्यरीती. .. | १२ |
| ३२. | वतनी मालमत्ता सोडून दिल्यानंतर चाकरीचा हक्क राहणे. .. .. | १२ |
| ३३. | हा अधिनियम संमत होण्यापूर्वी दत्तक घेतला असेल तर अशा वारसाच्या दत्तविधानाची अधिसूचना देणे. | १२ |

कलमे पृष्ठ

३४. हा अधिनियम संमत झाल्यानंतर दत्तक वारस घेण्यात येईल तेव्हा त्या दत्तविधानाची अधिसूचना देणे. १२
३५. दत्तविधानाची अधिसूचना योग्यरित्या देण्यात न आली तर अनुसरावयाची कार्यरिती. १३
३६. प्रातिनिधिक वतनदारांच्या मृत्युबाबत प्रतिवृत्त केले पाहिजे; वारसाचे नाव नोंदले पाहिजे. १३
३७. अल्पवयीन वतनदाराची कर्तव्य त्याच्या पालकाने केली पाहिजेत. .. .. १४

**विभाग ७**

**चाकरीची मुदत**

३८. प्रातिनिधिक वतनदारांनी तहह्यात किंवा पांच किंवा दहा वर्षांच्या ठराविक मुदतीपर्यंत चाकरी करणे. १४
३९. वहिवाटदार मृत्यू पावल्यास अनुसरावयाची कार्यरीती. .. .. .. १४
४०. आळीपाळीच्या वतनात वहिवाट करणारा निवडणे. .. .. .. १४
४१. प्रातिनिधिक वतनदारांनी वहिवाटदार नेमून देण्यात कसूर केली तर, नेमणूक .. करण्याची पद्धत. १५

**विभाग ८**

**वहिवाट करणारे वतनदार आणि प्रतिवतनदार**

४२. पदासंबंधींची कर्तव्ये प्रातिनिधिक वतनदाराने करणे. .. .. .. १५
४३. कलेक्टरने आवश्यक असलेल्या वहिवाटदारांची संख्या ठरविणे. .. .. १५
४४. [रद्द केले.]
४५. प्रातिनिधिक वतनदाराकडून किंवा त्याने नेमून दिलेल्या प्रतिवतनदाराकडून चाकरी घेण्यास कलेक्टरने केव्हा नकार द्यावा ते. १५
४६. प्रातिनिधिक वतनदाराचा वहिवाटदार किंवा प्रतिवतनदार वहिवाट करण्यास अयोग्य झाल्यास त्याला पदावरून दूर करण्याचा अधिकार. १६
४७. प्रातिनिधिक वतनदारास नकार दिला किंवा पदावरुन दूर करण्यात आले असेल तेव्हा अनुसरावयाची कार्यरीती. १७
४८. प्रतिवतनदारास नकार दिला किंवा त्याने वहिवाट करण्याचे बंद केले असेल तेव्हा अनुसरावयाची कार्यरीती. १७
४९. कोणत्या बाबतीत प्रातिनिधिक वतनदाराच्याऐवजी कलेक्टराने प्रतिवतनदार नेमला पाहिजे. १७
५०. [रद्द केले.]
५१. स्त्रीला वहिवाट करता येणार नाही परंतु प्रतिवतनदार नेमून देण्याचा अधिकार आहे. १८
५२. वहिवाटदार कामावरून तात्पुरता कमी झाला असेल तेव्हा, मामलतदारानें किंवा महालकऱ्यानें प्रतिवतनदार नेमणे. १८
५३. प्रतिवतनदार ही व्यक्ती सामान्यतः ज्या प्रातिनिधिक वतनदाराने वहिवाट करावयाची असेल त्याच्याच घराण्यातील असली पाहिजे. १८

**कलमे** **पृष्ठ**

५४. प्रतिवतनदाराच्या नेमणुकीची मुदत. .. .. .. १८
५५. वहिवाटदार गैरहजर किंवा आजारी असला तर, त्यास, तात्पुरता बदली नेमण्याचा अधिकार आहे. १९
५६. कुटुंब प्रमुखास वतनदार केव्हा समजावे. .. .. .. १९

**विभाग ९**

**शास्ती**

५७. वहिवाटदारांस शिक्षा. .. .. .. १९
५८. कलेक्टरला, राज्य सरकारच्या मंजुरीनें वहिवाटदारास काढून टाकण्याचा अधिकार आहे. १९
५९. [रद्द केले.]
६०. राज्य सरकारला वतन जप्त करण्याचा निदेश देण्याचा अधिकार आहे. .. २०
६१. प्रतिवतनदाराच्या गैरवर्तनाबद्दल वहिवाटदाराचा आणि प्रतिवतनदाराचा हितसंबंध तहह्यात जप्त करणे. .. २०
६२. चौकशी केल्यानंतर आदेश देणे. .. .. .. २०

**विभाग १०**

**ग्राम वंशपरंपरागत कनिष्ठ पदे**

६३. विभाग १० लागू करणे. .. .. .. २०
६४. कलेक्टरास दिलेले अधिकार. .. .. .. २०
कलेक्टरने नोंदणी पुस्तकांतील नोंद सुधारणे. .. .. .. २१
कलेक्टराला विवक्षित अधिकार मामलतदार आणि महालकरी यांच्याकडे सोपवून देण्याचा अधिकार आहे. २१
मामलतदार आणि महालकरी यांना दिलेले अधिकार. .. .. .. २१

**विभाग ११**

**नोंदणी पुस्तक**

६५. कलेक्टरने नोंदणी पुस्तक तयार करून ठेवणे. .. .. .. २२
६६. बिनचाकरी विषयक असलेल्या नोंदणी पुस्तकात कोणत्या गोष्टी नमूद करण्यात येतील ते. २२
६७. चाकरीबद्दलच्या नोंदणी पुस्तकात कोणत्या गोष्टी नमूद करण्यात येतील ते. .. २२
६८. नोंदणी पुस्तकात दुरुस्ती करणे. .. .. .. २२

**विभाग १२**

**संकीर्ण**

६९. वतनदारांनी बजवावयाची चाकरी. .. .. .. २३
७०. वतनासंबंधीची दप्तरे ही सरकारची मालमत्ता असणे. .. .. .. २३
७१. गावच्या दप्तरावर सही करण्याचा अधिकार वतनदारास आहे. .. .. २३

**कलमे** **पृष्ठ**

## विभाग १३

## कामकाजाची रीत आणि अपिले


७२. साक्षीपुरावा घेणे. .. .. .. २३

७३. चौकशी केल्यानंतर विभाग ३, ५, ६ आणि ७ अन्वये द्यावयाचे आदेश, लेखी देण्यात आले पाहिजेत. २३

सन १८६६ पासून दिलेले विवक्षित निर्णय नवीन, चौकशी न करता स्वीकारणे. २४

७४. कलेक्टराच्या कामकाजावर नियंत्रण. .. .. .. २४

७५. मामलतदारास विभाग १० अन्वये चौकशी करण्याचा अधिकार आहे. .. २४

७६. विशेष तरतूद केली असेल ती खेरीजकरून, इतर बाबतीत अपील दाखल न होणे. २४

७७. अपिले. .. .. .. २५

७८. अपिला संबंधीच्या विनंती अर्जासोबत आदेशाची प्रत असावी. अपील संक्षिप्तरीत्या चौकशी करून नाकारण्याचा अधिकार. २५

७९. कामकाज मागविण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. .. .. २५

८०. नोटीस कशी बजावावी. .. .. .. २५

८१. वसुली कशी करावी. .. .. .. २६

८२. राज्य सरकारने नियम बनविणे. .. .. .. २६

८३. वंशपरंपरागत अधिकाऱ्यांची कर्तव्ये राज्य सरकारने ठरविणे. .. .. २६

८४. विशेष अधिकाऱ्यांना अधिकार देणे. .. .. .. २६

८५. ह्या अधिनियमामुळे, सन १८६७ चा मुंबई अधिनियम ८ यास बाध न येणे. .. २७

**अनुसूची [रद्द केली.]**

**अनुसूची दुसरी--**

कलम ६० मध्ये उल्लेखिलेले अपराध


------------

# [१]सन १८७४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३
# *[ महाराष्ट्र वंशपरंपरागत पद अधिनियम ]

[ दिनांक ५ फेब्रुवारी, १८७५ ]

हा अधिनियम पुढील अधिनियमांन्वये अंशतः रद्द करण्यात आला :-

सन १८७६ चा अधिनियम १२ ;

सन १८८६ चा मुंबई अधिनियम ३ ;

हा अधिनियम पुढील अधिनियमांन्वये अंशतः रद्द करण्यात येऊन त्यात त्यान्वये सुधारणा करण्यात आल्या :-

सन १८९५ चा अधिनियम १६ ;

सन १८८६ चा मुंबई अधिनियम ५ ;

सन १९१० चा मुंबई अधिनियम ३ ;

हा अधिनियम सन १८८७ चा मुंबई अधिनियम ६ अन्वये अंशतः रद्द करण्यात येऊन त्यात त्यान्वये सुधारणा केल्या आणि (स्थानिक बाबतीकरिता) भर टाकण्यात आली.

ह्या अधिनियमांत पुढील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या :-

सन १९१५ चा मुंबई अधिनियम ३ ;

सन १९२५ चा मुंबई अधिनियम ११ ;

सन १९३० चा मुंबई अधिनियम ११ ;

सन १९३१ चा मुंबई अधिनियम १५ ;

सन १९३२ चा मुंबई अधिनियम १२ ;

सन १९५० चा मुंबई अधिनियम २८ ;

सन १९५८ चा मुंबई अधिनियम ८ ;

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम २४ ; (२२.८.२०१२) ;

त्यात भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश आणि विधी अनुकूलन आदेश, १९५० यान्वये अनुकूलन व रुपभेद करण्यात आले.

**वंशपरंपरागत पदांसंबंधी असलेला विधी ह्याची सुधारणा करण्याबाबत अधिनियम**

**ज्याअर्थी,** वंशपरंपरागत पदांसंबंधी असलेला विधी यात सुधारणा करून तो जाहीर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** यान्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :- प्रस्तावना.

---

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता, मुंबई शासकीय राजपत्र १८७३ भाग-पाच आणि पृष्ठे २०७ व ३०९ पहा, परिषदेमधील कार्यवाही याकरिता सदर राजपत्राची पृष्ठे ४३९, ४४३ व ४६२ मुंबई, शासकीय राजपत्र, १८७४ ची पृष्ठे १३५, १४८, १५६ व १६२ पहा.

सन १८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ द्वारे सुधारणा केलेला १८७४ चा अधिनियम ३ हा अहमदाबाद, खेडा, भडोच व सुरत या जिल्ह्यांमधील, तसेच सन १८८७ चा मुंबई अधिनियम ६ याची व्याप्ती ज्या जिल्ह्यापर्यंत पुढे वाढविण्यात आलेली आहे त्या पंचमहाल जिल्ह्यातील गावांमधील मतदारांना लागू करण्यासंबंधात पुढे मतदार अधिनियम, १८८७ (१८८७ चा मुंबई ६) याची कलमे १ व २ पहा.

फेरबदल व निरसने यांना अधीन राहून सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ हा या अधिनियमाबरोबर वाचण्यात यावा. १८८७ चा मुंबई ६ याचे कलम ४ पहा आणखी फेरबदलांकरिता नंतरच्या अधिनियमाचे कलम ५ पहा.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २४ च्या अनुसूचीद्वारे अधिनियमाच्या नावात बदल करण्यात आला.

## विभाग १

## प्रारंभिक

लघु संज्ञा.

**१.** या अधिनियमास [१][महाराष्ट्र वंशपरंपरागत पद अधिनियम] असे म्हणावे.

तो, विनियमाच्या अंमलाखालील सर्व जिल्ह्यांस आणि त्यांतील गावांना, मग अशी गावे दुमाला असोत किंवा नसोत, लागू आहे आणि धारकाने कोणतेही असे दुमाला गाव ज्या अटींवर धारण केले असेल त्या अटींशी वा अधिनियमाचे उपबंध तरतुदी ज्या मर्यादेपर्यंत विरोधी नसतील त्या मर्यादेपर्यंत हा अधिनियम लागू होईल.

कोणत्याही वतनाची किंवा वतनाच्या भागांची किंवा कोणत्याही वतनाच्या किंवा वतनांच्या भागांच्या उत्पन्नाची अनुक्रमे [२]सन १८५२ चा अधिनियम ११, किंवा सन १८६३ चे मुंबई अधिनियम २ आणि ७ किंवा त्यांच्याशी संबंधित सध्या अंमलात असलेला कोणताही इतर विधी यान्वये, व्यवस्था करण्याच्या [३][[४][राज्य] सरकारच्या] अधिकारास ह्या अधिनियमांतील कोणत्याही मजकुरामुळे बाध येणार नाही.

**२.** [अधिनियम रद्द करणे.] हे कलम सन १८७६ चा अधिनियम १२ यान्वये रद्द करण्यात आला.

भाग ६, ७, ८ व ९ लागू असणे.

**३.** [५][***] भाग ६, ७, ८ व ९ हे, पाटील किंवा कुळकर्णी यांच्याकडून कमी दर्जाच्या वंशपरंपरागत पदांस किंवा अशा पदांशी संलग्न असणाऱ्या वतनांना लागू असणार नाहीत.

अर्थ विवरणात्मक कंडिका.

**४.** विषयात किंवा संदर्भात एत्‌द्विरुध्द काही नसल्यास, या अधिनियमात,

"वतनी मालमत्ता" या संज्ञेचा अर्थ, वंशपरंपरागत पदांशी संबध्द असलेले कर्तव्य बजाविण्यासाठी पारिश्रमिक म्हणून धारण केलेली, संपादन केलेली किंवा अभिहस्तांकित केलेली स्थावर किंवा जंगम मालमत्ता समजावा. आणि तींत, पैशाच्या किंवा तत्सम स्वरूपात सामान्य फी किंवा अवांतर रक्कम, ठराविक वेळी किंवा वेळोवेळी घेण्याच्या हक्काचाही समावेश होतो.

आणि तींत, मूळच्या वतनी मालमत्तेखेरीज, वेळोवेळी कमीजास्त होण्यास किंवा रद्द होण्यास अधीन असलेली अशी जी रोख रक्कम [३][[४][राज्य] सरकार] आपखुशीने देत असेल तिचा समावेश होतो.

"वंशपरंपरागत पद" या संज्ञेचा अर्थ, प्रशासनासंबंधी किंवा सार्वजनिक महसूल वसूल करण्यासंबंधी किंवा ग्रामपोलीससंबंधी, किंवा हद्दीच्या भूमिव्यवस्थेसंबंधी किंवा दिवाणी प्रशासनासंबंधी कर्तव्य बजाविण्यासाठी वंशपरंपरागत धारण केलेले प्रत्येक पद, असा समजावा आणि या संज्ञेत, ज्या पदाशी संबध्द असलेली मूळ चाकरी संपली असेल अशा पदाचा समावेश होतो.

---

१ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूचीद्वारे अधिनियमाच्या नावात बदल करण्यात आला.

२ मुंबईचा जमीन महसुले माफ असलेल्या इस्टेटीबाबत अधिनियम, १८५२.

३ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "सरकार" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकार" हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे "ह्या अधिनियमाचे" हा मजकूर वगळण्यांत आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

वतनी मालमत्ता, कोणतीही असल्यास ती, वंशपरंपरागत पद आणि त्यांच्याशी संलग्न असलेले हक्क आणि विशेष अधिकार यांचा समावेश वतनात होतो.

"वतनदार" या संज्ञेचा अर्थ, वतनात वंशपरंपरागत हितसंबंध असणारा इसम असा समजावा आणि तीत वतनाच्या ठिकाणी ब्रिटीश सरकारचा अंमल सुरु होण्यापूर्वी त्याने संपादन केलेली मालमत्ता किंवा असा अंमल सुरू झाल्यानंतर, वैधरित्या संपादन केलेली मालमत्ता धारण करील त्या इसमाचा आणि त्याच्याकडून अशी मालमत्ता वारसाने धारण करील त्या इसमाचा समावेश होतो. तसेच, या संज्ञेत वतनाचा किंवा वतनाच्या भागाचा जो मालक असेल त्याने कलमे [१][ * * * ] ३३ ते ३५ यांत निर्दिष्ट केलेल्या शर्तीअन्वये दत्तक घेतलेल्या इसमाचाही समावेश होतो.

"कुटुंब" या संज्ञेत, मूळ वतनदाराच्या वंशाच्याच असलेल्या कुटुंबाच्या शाखांपैकी प्रत्येक शाखेचा समावेश होतो; परंतु, यानंतर पुढे कलम २६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे जो कोणताही पोट-विभाग मान्य केला असेल त्याव्यतिरिक्त इतर कोणताही पोट-विभाग मान्य केला जाणार नाही.

"कुटुंब प्रमुख" या संज्ञेत, कुटुंबाच्या प्रत्येक शाखेचा प्रमुख वारस याचा समावेश होतो.

"प्रातिनिधिक वतनदार" या संज्ञेचा अर्थ, वंशपरंपरागत पदाची कर्तव्ये बजाविण्याचा अधिकार असलेला म्हणून ज्याची नोंद कलेक्टरने [१][* * * ] कलम २५ अन्वये केली आहे तो वतनदार असा समजावा.

"वहिवाटदार" या संज्ञेचा अर्थ, त्या वेळी, वंशपरंपरागत पदाची कर्तव्ये प्रत्यक्ष बजावित असणारा इसम असा समजावा मग असा इसम प्रातिनिधिक वतनदार किंवा [२][ह्या अधिनियमाच्या] कोणत्याही उपबंधान्वये नेमलेली प्रतिइसम असो किंवा बदली इसम असो.

"पालक" या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही मुलाची देखरेख, प्रतिपाळ किंवा पालनपोषण करण्याची जबाबदारी स्वाभाविकरित्या किंवा मान्य असलेल्या रिवाजानुसार ज्यावर पडते असा नातेवाईक किंवा इतर इसम किंवा ज्याने कोणत्याही मुलाची देखरेख करण्याचे, त्याचा प्रतिपाळ करण्याचे किंवा त्याच्या पालनपोषणाचे काम स्वीकारले असेल किंवा प्रत्यक्षपणे घेतले असेल तो नातेवाईक किंवा इतर इसम किंवा हरकत घेण्यांत आली असेल त्या प्रसंगी, सक्षम न्यायालयाकडून पालकत्वाचे प्रमाणपत्र ज्यास मिळाले असेल तो इसम असा समजावा.

## विभाग २

## वतनी मालमत्ता आणि तीवरील उत्पन्न

वतन व वतनावरील हक्क दुमाला करून देण्यास प्रतिबंध.

[२][**५.** (१) [३][[४][राज्य] सरकारच्या] [५][किंवा तीस वर्षांहून अधिक मुदतीचे नाही असे गहाण, बोजा, अन्य संक्रमण किंवा पट्टा यांच्याबाबतीत कमिशनरच्या] मंजुरीवाचून--

---

१ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे "ह्या अधिनियमाचे" हा मजकूर वगळण्यात आला. ही अनुसूची, मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

२ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) याद्वारे हा मजकूर वगळण्यात आला होता आणि १८९५ च्या सुधारणा अधिनियमाद्वारे (१८९५ चा १६) तो पुन्हा समाविष्ट करण्यात आला.

३ सन १८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १ द्वारे मूळ कलम ५ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले. स्त्रीघटकाचा हक्क पुढे ढकलणे आणि विधवेचे हितसंबंध याबाबत कलम २ पहा.

४ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "सरकारच्या" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकारच्या" हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ विधी अनुकूलन आदेश १९५० द्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल करण्यात आला.

६ सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३, अनुसूचीद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(अ) वतनदाराने कोणतेही वतन किंवा त्याचा कोणताही भाग किंवा त्यातील हितसंबंध हे, त्याच्या स्वाभाविक आयुमर्यादेहून अधिक मुदतीकरिता, जो इसम त्याच वतनाचा वतनदार नसेल अशा कोणत्याही इसमाकडे किंवा तिच्या फायद्यासाठी गहाण ठेवणे, त्यावर बोजा टाकणे, ते दुमाला करून देणे किंवा पट्ट्याने देणे ;

(ब) प्रातिनिधिक वतनदाराने, ह्या अधिनियमान्वये त्याजकडे असा प्रातिनिधिक वतनदार म्हणून नेमून दिलेला त्याला जो कोणताही हक्क मिळाला असेल तो गहाण ठेवणे, त्यावर बोजा टाकणे, तो पट्ट्याने देणे किंवा दुमाला करून देणे ;

हे त्याच्या अधिकारात असणार नाही.

(२) कलम १५ अन्वये किंवा ते कलम अंमलात येण्यापूर्वी, ज्या वतनाच्या संबंधाने चाकरीच्या मोबदल्यादाखल रूपांतरित धारेबंदीची भूमिव्यवस्था अंमलात आली असेल अशा कोणत्याही वतनाच्या बाबतींत ह्या कलमाची कंडिका (अ) अशा वतनाला लागू होईल, परंतु [१][[२] [राज्य] सरकारच्या] मंजुरीवाचून असे वतन दुमाला करून देण्याचा हक्क, वतनदारांकडे, अशा भूमिव्यवस्थेच्या अटींद्वारे सोपवून दिला असेल किंवा उक्त अटींद्वारे त्यांनी तो प्राप्त करून घेतला असेल तर, ह्या कलमाची कंडिका १ त्या वतनाला लागू असणार नाही.

कलेक्टरास वतनाच्या संरक्षणासाठी वैध कारवाई करण्याचा अधिकार असणे.

**६.** (१) ज्या प्रकरणात, कोणत्याही वतनासंबंधी किंवा वतनाची भूसंपत्ती, मालमत्ता, निधी किंवा कारभार यांबाबत वैध कारवाई करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे कलेक्टरास दिसून येईल त्या कोणत्याही बाबतीत कलेक्टरने असे प्रकरण लिहून आणि त्यावर आपली स्वाक्षरी करून [३][[४][ * * * ] कमिशनरकडे] पाठविले पाहिजे. आणि अशा प्रकरणाच्या स्पष्टिकरणार्थ जी विवरणपत्रके आणि तपशील त्याच्या मते आवश्यक आणि योग्य असतील तीही त्याचबरोबर पाठविण्यांत आली पाहिजेत. आणि त्यानंतर परिस्थितीचा विचार करुन [५][उक्त कमिशनरने] त्यास योग्य वाटेल तर, वतनाच्या किंवा त्याच्या भूसंपत्तीच्या, मालमत्तेच्या निधीच्या किंवा कारभाराच्या संरक्षणासाठी जी वैध कारवाई आवश्यक किंवा इष्ट असेल ती, त्या गोष्टीसंबंधी क्षेत्राधिकार असणाऱ्या कोणत्याही दिवाणी न्यायालयात कलेक्टरला त्याच्या नावे दाखल करण्याचा किंवा चालविण्याचा अधिकार कलेक्टरास दिला पाहिजे. अशा कारवाईचा खर्च प्रतिपक्षाकडून वसूल न होईल तर वतनाच्या निधीतून दिला पाहिजे.

कलमे ८ ते ११ किंवा कलम १३ अन्वये काम चालविण्याचा अधिकार कलेक्टरास आहे.

(२) कलेक्टरला, ह्या कलमान्वये वैध कारवाई दाखल करण्याऐवजी किंवा चालविण्याऐवजी जर त्यास योग्य वाटेल तर, [६][ * * * ] कलमे ८, ९, १०, ११ किंवा १३ यांत तरतूद केल्याप्रमाणे कारवाई करण्याचा अधिकार आहे.

---

१ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "सरकारच्या" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकारच्या" हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल करण्यात आला.

३ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब याद्वारे महसूल हा शब्द वगळण्यात आला. ही अनुसूची, मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

४ सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याचे कलम ३ अनुसूची याद्वारे "राज्य सरकारकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ वरील अधिनियमाचे कलम ३ अनुसूचीद्वारे "राज्य सरकारने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) द्वारे "या अधिनियमाची" हा मजकूर वगळण्यात आला.

**७.** वहिवाटदाराचे पारिश्रमिक म्हणून [1][ * * *] कलम २३ अन्वये नेमून दिलेली वतनी मालमत्ता, आणि अशा नेमून दिलेल्या वतनी मालमत्तेवरील उत्पन्न हे [2][[3] [राज्य] सरकारच्या] मंजुरीवाचून कोणत्याही इसमाला दुमाला करुन देता येणार नाही किंवा नेमून देता येणार नाही.

पारिश्रमिक म्हणून नेमून दिलेले वतन मंजुरीवाचून दुमाला करता येणार नाही.

**८.** कोणतेही वतन किंवा त्याचा कोणताही भाग, किंवा त्यावरील कोणतेही उत्पन्न वहिवाटदारास त्याचे पारिश्रमिक म्हणून सोपवून दिले असो किंवा नसो, ते ज्यावेळी, कोणत्याही [4][न्यायालयाच्या] हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये किंवा असा आदेश किंवा हुकुमनाम्याची अंमलबाजावणी केल्यामुळे वहिवाटदार असणाऱ्या इसमाखेरीज इतर इसमाच्या मालकीत किंवा फायदेशीर कब्जांत हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी गेले असेल किंवा वहिवाटदाराखेरीज इतर इसमाच्या मालकीत किंवा फायदेशीर कब्जांत कोणत्याही [4][न्यायालयाच्या] हुकूमनाम्याखेरीज किंवा आदेशाखेरीज किंवा असा आदेश किंवा हुकूमनामा बजाविल्याखेरीज इतर रितीने गेले असेल तेव्हा, अथवा वहिवाटदाराचे पारिश्रमिक म्हणून जे अभिहस्तांकित करून दिले नसेल असे कोणतेही वतन किंवा त्याचा भाग, किंवा त्यावरील कोणतेही उत्पन्न हे ज्यावेळी कोणत्याही [4][न्यायालयाच्या] हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये किंवा असा आदेश किंवा हुकुमनामा यांची बजावणी करुन किंवा इतर रितीने अशा वहिवाटदाराखेरीज इतर इसमाच्या मालकीत किंवा फायदेशीर कब्जांत हा अधिनियम अंमलांत आल्याच्या तारखेनंतर गेले असेल तेव्हा ;

वहिवाटदाराखेरीज इतर इसमाच्या कब्जांत गेलेली वतनी मालमत्ता, वहिवाटदाराला पारिश्रमिकाचे अंशदान देण्यास पात्र असेल.

असे वतन, किंवा त्याचा कोणताही भाग, किंवा त्यावरील उत्पन्न हे, कलेक्टराच्या आदेशान्वये तशाच रीतीने आणि तितक्याच मर्यादेपर्यंत, असा हुकूमनामा झाला नव्हता किंवा असे हस्तांतरण घडलेच नव्हते अशा रीतीने अशा वहिवाटदाराच्या पारिश्रमिकासाठी अंशदान देण्यास पात्र ठरेल.

**९.** (१) वहिवाटदाराकडे त्यांचे पारिश्रमिक म्हणून सोपवून दिलेले किंवा न दिलेले असे कोणतेही वतन किंवा वतनाचा भाग किंवा त्यावरील कोणतेही हे, त्याच वतनाचा वतनदार नसणाऱ्या अशा कोणत्याही इसमाच्या मालकीत किंवा फायदेशीर कब्जांत, कोणत्याही ब्रिटीश न्यायालयाच्या हुकूमनाम्याखेरीज किंवा आदेशाखेरीज किंवा असा आदेश किंवा हुकूमनामा यांची बजावणी न करता इतर रीतीने व कलेक्टराच्या मंजुरीवाचून आणि मुलकी दफ्तरांत मालकी त्याच्या नावावर हस्तांतरित झाल्याशिवाय, हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी गेले असेल तेव्हा, कलेक्टरास, त्याच्या कारणांची लेखी नोंद करुन असे अन्य संक्रमण रद्द आणि निरर्थक आहे असे जाहीर करण्याचा अधिकार आहे आणि त्यास, त्या वतनावर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर किंवा त्यावरील कोणत्याही उत्पन्नावर पूर्वी ज्या वतनदाराचा हक्क होता त्या वतनदाराच्या स्वाधीन असे वतन, किंवा त्याचा कोणताही भाग किंवा त्यावरील उत्पन्न, आदेश दिल्याच्या तारखेपासून करण्यात येत असल्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे. तसेच त्यास त्यावरील कोणतेही उत्पन्न वसूल करण्याचा व ते अशा वतनदारास देण्याचाही अधिकार आहे.

वतनी मालमत्तेचे अन्य संक्रमण हे विवक्षित परिस्थितीत रद्द आणि निरर्थक आहे असे जाहीर करण्याचा कलेक्टरास अधिकार असणे.

---

१ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) द्वारे "या अधिनियमाचा" हा मजकूर वगळण्यात आला.

२ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "सरकारच्या" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारच्या" हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ वरील आदेशाद्वारे "ब्रिटीश न्यायालयाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कलेक्टरास जमिनीच्या बाबतीत पूर्ण खंड वसूल करण्याचा अधिकार असणे.

(२) वतनाचा असा भाग जमीन असेल तर त्या जमिनीचा कब्जा हस्तांतरित न करता, कलेक्टरने त्याच ठिकाणातील तशाच वर्णनाच्या जमिनींची कुळे जो पूर्ण खंड सामान्यत: देत असतील तितक्या खंडाची मागणी करणे आणि तो वसूल करणे हे विधिसंमत असेल. अशा प्रकारे वसूल केलेली रक्कम ही उत्पन्न असल्याचे समजण्यात आले पाहिजे आणि पूर्ण खंड किती आहे याबद्दल कलेक्टरने दिलेला निर्णय अखेरचा असेल.

वहिवाटदाराचे पारिश्रमिक म्हणून सोपवून दिलेल्या वतनी मालमत्तेवरील जप्ती, कलेक्टराचे प्रमाणपत्र मिळाल्यावर दिवाणी न्यायालयाने उठवावी.

**१०.** ज्या कोणत्याही वतनाची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची किंवा त्यावरील कोणत्याही उत्पन्नाची ते तसे असल्याबद्दल मुलकी दफ्तरात नोंद केली असेल किंवा ज्याची ह्या अधिनियमान्वये नोंदणी केली असेल असे आणि जे वहिवाटदारास त्याचे पारिश्रमिक म्हणून [१][* * *] कलम २३ अन्वये सोपवून दिलेले असेल असे कोणतेही वतन किंवा त्याचा भाग किंवा त्याच्यावरील उत्पन्न हे कोणत्याही [२][न्यायालयाच्या] हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये किंवा तो हुकूमनामा किंवा आदेश यांची अंमलबजावणी करून त्यावेळी वहिवाटदार असणाऱ्या इसमाखेरीज इतर कोणत्याही इसमाच्या मालकीत किंवा फायदेशीर कब्जांत [३][[४][राज्य] सरकारच्या] मंजुरीवाचून [५][हा अधिनियम] अंमलात आल्याच्या तारखेनंतर गेले आहे किंवा जाईल; किंवा असे कोणतेही वतन, किंवा त्याचा कोणताही भाग किंवा त्यावरील कोणतेही उत्पन्न हे अशा प्रकारे सोपवून दिलेले नसेल ते त्याच वतनाचा वतनदार नसणाऱ्या कोणत्याही इसमाच्या मालकीत किंवा फायदेशीर कब्जांत अशा प्रकारे गेले आहे [६][किंवा जाईल] असे कलेक्टरला आढळेल तेव्हा, ज्या मालमत्तेस तो हुकूमनामा किंवा आदेश लागू असेल ती मालमत्ता वतन म्हणून आहे किंवा वतनाचा भाग आहे किंवा ती मालमत्ता वतनाचे उत्पन्न किंवा उत्पन्नाचा भाग आहे किंवा ती वहिवाटदाराकडे त्याचे पारिश्रमिक म्हणून सोपवून दिली आहे व त्यामुळे ती अभिहस्तांकित करण्यास पात्र नाही अशा मजकुराचे प्रमाणपत्र कलेक्टरच्या सही व शिक्क्यानिशी मिळाल्यावर न्यायालयाने, उक्त वतनावर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर किंवा त्याच्या उत्पन्नापैकी कोणत्याही उत्पन्नावर कोणतीही जप्ती किंवा आदेशिका अनिर्णित असेल ती काढून टाकली पाहिजे आणि त्याची विक्री किंवा विक्री करण्याबाबतचा आदेश किंवा त्याचे हस्तांतरण रद्द केले पाहिजे व ज्या हुकूमनाम्याबाबत किंवा आदेशाबाबत तक्रार आली असेल त्या हुकूमनाम्याचा किंवा आदेशाचा उक्त वतनाशी किंवा त्याच्या कोणत्याही भागाशी किंवा त्यावरील कोणत्याही उत्पन्नाशी जितका संबंध असेल तितक्यापुरता तो हुकूमनामा किंवा आदेश रद्द केला पाहिजे.

**११.** [७][***] कलम १० मध्ये वर्णन केलेले कोणत्याही प्रकारचे अन्य संक्रमण हे ज्यावेळी कोणत्याही

---

१ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे "या अधिनियमाचे" हा मजकूर वगळण्यात आला. ही अनुसूची, मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

२ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "ब्रिटीश न्यायालयाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "सरकारच्या" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारच्या" हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) याद्वारे हा मजकूर वगळण्यात आला होता आणि १८९५ च्या सुधारणा अधिनियमाद्वारे (१८९५ चा १६) तो पुन्हा समाविष्ट करण्यात आला.

६ मुंबई वंशपरंपरागत पद सुधारणा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ५) याद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

७ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे "ह्या अधिनियमाचे" हा मजकूर वगळण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

[1][न्यायालयाच्या] हुकूमनाम्याखेरीज किंवा आदेशाखेरीज किंवा तो बजाविल्याखेरीज इतर रीतीने करण्यात येईल तेव्हा, कलेक्टरने त्याबाबतची त्याची कारणे नमूद करून असे अन्य संक्रमण हे रद्द आणि निरर्थक असल्याचे जाहीर केले पाहिजे. [2][* * *]

हा अधिनियम संमत झाल्यानंतर वतनी मालमत्तेचे अन्य संक्रमण हे रद्द आणि निरर्थक आहे असे कलेक्टरने जाहीर करणे.

[3]**[११ अ.** कलेक्टरचे प्रमाणपत्र मिळाल्यावर कलम १० अन्वये न्यायालयाने दिलेला आदेश किंवा कलम ११ अन्वये कलेक्टरचा जाहीरनामा हा ज्या मालमत्तेच्या संबंधात असेल त्या सर्व मालमत्तेचा कब्जा कलेक्टराने त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे संक्षिप्त रीतीने काम चालवून परत घेतला पाहिजे किंवा कलम ९ कंडिका २ मध्ये विहित केलेल्या दराने तिच्यावर आकारणी केली पाहिजे, आणि त्यानंतर उक्त मालमत्ता ही वतनाची मालमत्ता होईल.]

कलम १० किंवा कलम ११ अन्वये दिलेला आदेश ज्या मालमत्तेस लागू असेल ती परत घेणे.

**१२.** [4][* * *] कलमे ८, ९ आणि ११ चे उपबंध अंमलात आणणे आवश्यक असेल तेव्हा कलेक्टरास,-

कलमे ८, ९ आणि ११ चे उपबंध अंमलात आणण्याच्या कामी कलेक्टराचे अधिकार.

(अ) कोणतीही जमीन अवैधरित्या ज्या इसमाच्या कब्जात असेल त्यास संक्षिप्त रीतीने काम चालवून काढून टाकणे, आणि

(ब) कोणत्याही इसमाकडून जो कोणताही खंड येणे असेल तो, त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही विधीत महसुलाची मागणी कशी करावी ह्यासंबंधी जी कोणतीही रीत विहित केली असेल त्या रीतीने वसूल करणे ;

हे विधिसंमत असेल.

---

१ विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "ब्रिटीश न्यायालयाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ कलम ४ द्वारे आणि त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, एकतर संक्षिप्त रितीने काम चालवून परत घेतला पाहिजे किंवा या अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड २ मध्ये विहित केलेल्या दराने तिच्यावर आकारणी केली पाहिजे आणि त्यानंतर ती मालमत्ता वतनाची मालमत्ता होईल हा मजकूर वगळण्यात आला.

३ सन १८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ याद्वारे कलम ११ क समाविष्ट करण्यात आले.

४ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे "ह्या अधिनियमाचे" हा मजकूर वगळण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

पारिश्रमिक म्हणून सोपवून दिलेले वतन न्यायालयाच्या आदेशिकेस पात्र नसणे.

**१३.** वहिवाटदाराचे पारिश्रमिक म्हणून [१][***] कलम २३ अन्वये सोपवून दिलेली मालमत्ता व त्या मालमत्तेवरील उत्पन्न कोणत्याही दिवाणी न्यायालयाच्या आदेशिकेस पात्र असणार नाही.

ज्यात उल्लेख केलेली विवक्षित मालमत्ता ही अशा प्रकारे सोपवून दिलेली वतनी मालमत्ता आहे अशा मजकुराचे कलेक्टरच्या सही व शिक्क्यानिशी असलेले प्रमाणपत्र मिळाल्यावर, अशा मालमत्तेवर किंवा तीवरील उत्पन्नावर जप्ती बसविलेली असेल किंवा आदेशिका असेल ती न्यायालयाने दूर केली पाहिजे, किंवा अशा मालमत्तेची किंवा त्या मालमत्तेस लागू असणारी किंवा तीवरील उत्पन्नाची किंवा त्या उत्पन्नास लागू असणारी कोणतीही विक्री रद्द केली पाहिजे.

वंशपरंपरागत पदांचे गट करणे.

**१४.** (१) कलेक्टरने एकाच गावात किंवा एकाच गावाच्या भागात एकाच प्रकारची चाकरी करण्याबद्दल दोन किंवा अधिक वतने धारण केलेली असतील तर ती, लेखी नमूद करावयाच्या कारणासाठी एकत्र करणे हे विधीसंमत असेल.

(२) [पूर्वीच्या गटाचे वैधकरण.] हे कलम सन १८९५ चा मुंबई अधिनियम १६ या अन्वये रद्द करण्यात आले.

## विभाग ३

## वतनाचे मोबदले

चाकरीबद्दल मोबदला.

**१५.** (१) कलेक्टरास, वतन धारण करणाऱ्याच्या इसमाने लेखी संमती दिल्यास, त्याचे वारस आणि उत्तराधिकारी यांना नेहमीकरता चाकरी बजाविणाच्या जबाबदारीतून, कलेक्टर आणि असा धारेकरी हे ज्या शर्ती कबूल करतील त्या शर्तीवर मग अशा शर्ती ह्या कलेक्टर उपबंधांशी सुसंगत असोत किंवा नसोत, मुक्त करण्याचा अधिकार आहे.

(२) [पूर्वीच्या तडजोडीचे वैधकरण] हे पोट कलम सन १८९५ चा अधिनियम, १६ या अन्वये रद्द करण्यात आले.

तडजोड कोणावर बंधनकारक असेल.

(३) ह्या कलमान्वये केलेली किंवा कायम केलेली प्रत्येक तडजोड ही [२][[३][राज्य] सरकारवर] आणि तसेच वतन धारण करणारा, त्याचे वारस आणि उत्तराधिकारी यांच्यावर बंधनकारक असेल.

"धारण करणारा" म्हणजे कोण.

(४) ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता "धारण करणारा" या संज्ञेत, कोणताही सर्वस्वी मालक असेल त्याचा किंवा सामाईक मालक असतील त्या सर्वांचा किंवा फायदेशीर हितसंबंध असणाऱ्या इसमांचा प्रतिनिधी म्हणून ज्याच्याशी व्यवहार करण्यात येत असेल किंवा त्याप्रमाणे तो आहे म्हणून तडजोडीच्यावेळी सरकारी दफ्तरात ज्याचे नाव असेल तो, यांचा समावेश होतो.

ग्रामसेवकांकडून वहिवाटीनुसार चालत आलेली चाकरी घेण्याच्या व्यक्तिंच्या हक्कांस बाध न येणे.

**१६.** ज्या ग्रामसेवकांना वहिवाटीनुसार चालत आलेली चाकरी बजाविण्याकरिता वतने दिली होती किंवा अशा चाकरीबद्दल त्यांनी ती धारण केली होती परंतु [२][[३][राज्य] सरकारने] अशी चाकरी बजाविण्याच्या जबाबदारीतून ज्यांना मुक्त केले आहे अशा ग्रामसेवकांकडून अशाच प्रकारची चाकरी करून घेण्याच्या व्यक्तिंच्या किंवा गांवातील समाजाच्या हक्कांना निकटपूर्वीच्या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे बाध येतो असे गृहीत धरण्यात येणार नाही.

---

१ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे "ह्या अधिनियमाचे" हा मजकूर वगळण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

२ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "सरकारवर" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारवर" हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१७.** जहागिरदार किंवा इनामदार किंवा मेहवासी प्रमुख किंवा आकारणीची संपूर्णत: किंवा अंशत: माफी असलेल्या स्थावर मालमत्तेचे जे मालक असतील किंवा उपभोग घेणारे असतील त्यांच्याकडून मिळावयाची वतनाची सर्व किंवा त्यापैकी कोणतीही मालमत्ता ही, पैशाच्या स्वरूपात किंवा इतर स्वरूपांपैकी कोणत्याही प्रकारच्या स्वरूपात असेल तेव्हा, कलेक्टरास वसूल करणे असलेली अशी रक्कम वेळोवेळी ठरविण्याचा अधिकार कलेक्टराला आहे ; परंतु, सरकारी गावाच्या बाबतीत, त्या-त्या वेळी जे प्रमाण चालू असेल त्या प्रमाणान्वये जितकी रक्कम मागता येईल त्यापेक्षा अधिक रकमेची मागणी करता येणार नाही.

दुमाला गावातून आकारणीची रक्कम देणे.

**१८.** जेव्हा पाटलाच्या किंवा कुळकर्ण्याच्या वतनाहून कमी दर्जाच्या गाव वतनाची सर्व किंवा कोणतीही मालमत्ता ही, व्यक्तींकडून प्रत्यक्ष पैशाच्या स्वरूपात किंवा इतर स्वरुपात बसविण्याच्या हक्काच्या रूपांत असेल तेव्हा, हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही इसमाने अर्ज केल्यावर कलेक्टरने जे हक्क व कर्तव्य बजवावयाची त्याचे स्वरूप व मर्यादा आणि रक्कम देण्यास आणि कर्तव्य बजाविण्यास कोणत्या कुटुंब किंवा वर्ग पात्र आहेत या गोष्टी कलेक्टरने पंचायतीकडून ठरवून घेणे हे विधीसंमत असेल. अशा पंचायतीचे पाच सदस्य असतील. यांपैकी दोन सदस्य गांवकऱ्यांनी नेमून दिलेले, दोन वतनदारांनी व एक सदस्य कलेक्टरने नेमून दिलेला असेल. कलेक्टरने नेमून दिलेला सदस्य हा 'सरपंच' असेल. पंचायतीच्या सदस्यांच्या बहुमतानुसार निर्णय घेण्यात आला पाहिजे परंतु, गावकरी किंवा वतनदार हे सात दिवसांच्या आत सदस्य नामनिर्दिष्ट न करून देतील तर, पाच इसमाच्या पंचायतीची रचना करण्यास आवश्यक असतील असे सदस्य कलेक्टरने नेमले पाहिजेत :

विवक्षित वर्गाच्या वतनदारांचे हक्क आणि कर्तव्य मर्यादित करण्यासाठी पंचायतीची नेमणूक करणे.

तसेच, सरपंच नेमल्यापासून सात दिवसाच्या आत पंचायतीने निर्णय न केला तर, कलेक्टरास जातीने त्याचा निर्णय देण्याचा अधिकार आहे.

वर तरतूद केल्याप्रमाणे पंचायतीचा किंवा कलेक्टरचा निर्णय हा अखेरचा असेल आणि त्याअन्वये ज्या इसमांचे किंवा ज्या वर्गाच्या इसमांचे हक्क, कर्तव्य किंवा जबाबदाऱ्या ठरविण्यात आल्या असतील त्या सर्व इसमांवर किंवा त्या वर्गाच्या इसमांवर बंधनकारक असेल.

**१९.** पंचायतीने निर्णय न केल्यामुळे निकटपूर्वीच्या कलमान्वये कलेक्टर निर्णय देईल तेव्हा, आणि वतनांचे किंवा त्याच्या भागाचे उत्पन्न कमीजास्त रकमेचे असते असे आढळून येईल तेव्हा, किंवा ते इतर स्वरूपात देण्यात येते असे आढळून येईल तेव्हा, कलेक्टरने देणे असलेली रक्कम ठरविणे व ती पैशाच्या स्वरूपात की इतर स्वरूपात द्यावी हे ठरविणे विधिसंमत असेल.

वतनाचे उत्पन्न कमीजास्त होण्याच्या बाबतीत देणे असलेली रक्कम ठरविण्याची पध्दत.

हा अधिनियम संमत होण्यापूर्वी केलेल्या तडजोडीचे वैधकरण.

**२०.** कलेक्टरने किंवा [१][[२][राज्य] सरकारने] योग्यरीत्या ज्यास अधिकार दिला असेल अशा अधिकाऱ्याने [३][* * *] कलमे १७, १८ किंवा १९ यांत सांगितलेल्या प्रकारची, हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी केलेली कोणतीही तडजोड, ती ह्या अधिनियमान्वये केली असल्याप्रमाणेच अंमलात असेल.

राज्य सरकार निदेश देईल अशा मुदतीसाठी तडजोड करणे.

**२१.** हा अधिनियम अंमलात आल्यानंतर, [३][* * *] कलमे १७, १८, आणि १९ यात सांगितलेल्या प्रकारच्या करावयाच्या तडजोडी ह्या [४][[२][राज्य] सरकार] वेळोवेळी, निदेश देईल इतक्या मुदतीकरितां करण्यात आल्या पाहिजेत.

## विभाग ४
## नवीन वतने करणे व जुनी वतने रद्द करणे

नवीन वतने करणे.

**२२.** कोणतेही वतन अस्तित्त्वात नसेल तेव्हा [४][[२][राज्य] सरकारने] नवीन वतन करणे व तसे करतांना त्या त्या वेळी अंमलांत असणाऱ्या कोणत्याही विधिन्वये [५][* * *] आवश्यक ती मंजुरी घेऊन [६][[७][राज्य सरकारमध्ये] निहित असलेली अशी मालमत्ता] [४][[२][राज्य] सरकारने] त्याकडे सोपविणे हे विधीसंमत असेल.

अशी वतने ह्या अधिनियमाच्या सर्व उपबंधास अधीन असतील, आणि वतनदारांनी, त्यांना ह्या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही इतर विधिन्वये प्रदान केलेली कर्तव्य बजाविली पाहिजेत आणि दिलेले अधिकार चालविले पाहिजेत.

वतन किंवा वतनाचा भाग रद्द केल्यामुळे किंवा जप्त केल्यामुळे किंवा [४][[२][राज्य] सरकारने] असे वतन किंवा त्याचा भाग इतर वैध रितीने परत घेतला असेल किंवा कोणत्याही विशिष्ट कुटुंबाचा वतन धारण करण्याचा हक्क अस्तित्त्वांत नसेल किंवा तो सिध्द झाला नसेल तेव्हा [४][[२][राज्य] सरकारने] त्यास योग्य वाटेल अशा इसमाकडे किंवा अशा इसमांकडे असे वतन किंवा वतनाचा भाग, या कलमाच्या पहिल्या कंडिकेत उल्लेखिलेली मंजुरी घेऊन, सोपवून देणे हे विधीसंमत असेल.

## विभाग ५
## वहिवाटदारांचे पारिश्रमिक

वहिवाटदारांची उपलब्धी कलेक्टरने ठरवावी.

**२३.** ह्या अधिनियमाच्या उपबंधास आणि चाकरी इनामे, रोकड भत्ते आणि निवृत्ति-वेतने याबाबत त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या विधीस अधीन राहून, कलेक्टरने ह्या अधिनियमाच्या उपबंधांन्वये नेमण्यात आलेल्या वहिवाटदारांची वार्षिक उपलब्धी ठरविणे आणि त्या त्या वेळी जे वहिवाटदार असतील त्यांना त्याची रक्कम देण्याचा निदेश देणे हे त्याचे कर्तव्य असेल.

कलेक्टरला या कारणासाठी वतनी मालमत्ता सोपवून देण्याचा अधिकार आहे.

या कारणाकरिता, कलेक्टरने, वहिवाटदारांकडे त्यांच्या उपलब्धीसाठी, वतनी मालमत्ता किंवा तीवरील उत्पन्न सोपवून देणे हे विधीसंमत असेल. अस्तित्वात असलेली अभिहस्तांकने ही, सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्यात फेरफार करण्यात येईपर्यंत, ह्याच कलमान्वये केलेली आहेत असे समजले पाहिजे. [४][[२][राज्य] सरकारची] मंजुरी घेऊन, कलेक्टरला, अभिहस्तांकनामध्ये कारणपरत्त्वे फेरफार करण्याचा आणि त्याचे मूल्य वाढविण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार आहे. परंतु मूल्यांत केलेली अशी वाढ किंवा घट ही, वतन धारण करणाऱ्यांना अशा वतनापासून अनुक्रमे जे उत्पन्न मिळत असेल त्याच्या प्रमाणात असावी.

---

१ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "सरकारने" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारने" हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे "ह्या अधिनियमाचे" हा मजकूर वगळण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

४ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "गव्हर्नर इन कौन्सील" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकार" हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ वरील आदेशाद्वारे "किंवा गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया इन कौन्सीलच्या आदेशान्वये" हा मजकूर वगळण्यात आला.

६ वरील आदेशाद्वारे "सरकारची मालमत्ता" या मजकुराऐवजी, ''प्रांताच्या प्रयोजनाकरिता राजाकडे निहित असलेली मालमत्ता'' हा मजकूर दाखल करण्यात आला.

७ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांताच्या प्रयोजनाकरिता राजाकडे निहित असलेली मालमत्ता" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## विभाग ६

## प्रातिनिधिक वतनदार

[१]२४. कोणत्याही वंशपरंपरागत पदाशी संबंद्ध असणारी कर्तव्ये प्रातिनिधिक वतनदारांनी किंवा प्रतिवतनदारांनी किंवा बदली वतनदारांनी-इतर कोणत्याही इसमांनी नव्हे-पुढे तरतूद केल्याप्रमाणे बजावली पाहिजेत. प्रातिनिधिक वतनदारांनी पदासंबंधीची कर्तव्य बजावणे.

[१]२५. या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, चाकरीबद्दलच्या वतनासंबंधी रिवाज ठरविण्याचा आणि प्रातिनिधिक वतनदार म्हणून कोणत्या इसमांना मान्यता द्यावी हे यात पुढे तरतूद केल्याप्रमाणे ठरविणे आणि त्यांची नोंदणी करणे हे कलेक्टरचे कर्तव्य असेल. प्रातिनिधीक वतनदार ठरविणे व त्यांची नोंदणी करणे.

[१]२६. कुटुंबाच्या कोणत्या प्रमुखांना प्रातिनिधिक वतनदार म्हणून मान्यता द्यावी आणि वतनासंबंधी चाकरीबाबतचा कोणता रिवाज आहे हे ठरवितांना कलेक्टराने अती प्राचीन काळापासून तो आजतागायत चालत आलेल्या ज्या प्रघातासंबंधी दफ्तरे किंवा इतर पुरावा उपलब्ध आहे अशा प्रघाताची चौकशी करावी आणि तो विचारात घ्यावा. परंतु, [२]सन १८४३ चा अधिनियम क्रमांक ११ अंमलात आल्यानंतर कलेक्टरला करण्यात आलेल्या ज्या नेमणुका किंवा पोट-विभाग हे वतनाच्या रिवाजाविरुध्द आहेत असे त्यांस वाटेल तर त्या नेमणुकांना किंवा पोट-विभागांना मान्यता देणे त्यांजवर बंधनकारक असणार नाही. प्रातिनिधीक वतनदार कोण हे ठरवितांना पूर्वीचा प्रघात विचारात घेणे.

[१]२७. फक्त एकाच कुटुंबातील व्यक्तिने चाकरी करण्याचा रिवाज आहे असे कलेक्टरला आढळून येईल तर, त्याने प्रातिनिधिक वतनदार म्हणून फक्त अशाच कुटुंबातील प्रमुखांचे नाव नोंदले पाहिजे. इतर इसमांच्या नावाची नोंदणी करता कामा नये. एकमेव प्रातिनिधीक वतनदार म्हणून कुटुंब प्रमुखांचे नाव नोंदणे.

[१]२८. अनेक कुटुंबांपैकी प्रत्येक कुटुंबातील व्यक्तिने एकाच वेळी किंवा लागोपाठच्या मुदतीने कर्तव्य पार पाडण्याचा रिवाज आहे असे कलेक्टरला आढळून येईल तर, त्याने प्रातिनिधिक वतनदार म्हणून अशा कुटुंबांपैकी प्रत्येक कुटुंबाच्या प्रमुखांचे नाव नोंदले पाहिजे. परंतु इतर इसमांच्या नोंदी करता कामा नये आणि लागोपाठच्या मुदतीने चाकरी करण्याचा रिवाज अस्तित्त्वात आहे असे सिध्द झाल्याच्या बाबतीत प्रातिनिधिक वतनदारांनी कोणत्या क्रमानुसार वहिवाट करावी तो क्रम त्याने ठरविला पाहिजे. प्रातिनिधिक वतनदार म्हणून कुटुंबांच्या प्रमुखांची नांवे नोंदवावी.

[१]२९. (१) लागोपाठच्या मुदतीने चाकरी करण्याचा प्रघात अस्तित्त्वात होता असे आढळून येईल, परंतु तो प्रघात [२]सन १८४३ चा अधिनियम ११ अंमलात आल्याच्या तारखेस अस्तित्त्वात होता असे कलेक्टरचे समाधान होईल अशारितीने सिध्द न करण्यात आले किंवा अनेक कुटुंबातून एका कुटुंबाची निवड करण्याचा प्रघात प्रचारात असेल तेव्हा, मूळ वतनदाराच्या वंशज असलेल्या ज्येष्ठ कुटुंबाचा प्रमुख कोण हे कलेक्टरने ठरविले पाहिजे आणि त्याचे नाव एकमेव प्रातिनिधिक वतनदार म्हणून नोंदले पाहिजे. ज्येष्ठ कुटुंबांच्या प्रमुखाचे नाव एकमेव प्रातिनिधिक वतनदार म्हणून नोंदणे.

---

१ कलमे २४ ते २९ यांच्या त्या त्या भागापुरत्या निरसनासंबंधी मतदार अधिनियम, १८८७ (१८८७ चा मुंबई ६) कलमे १ व ३ पहा.

२ या अधिनियमाच्या कलम २ द्वारे सन १८४३ चा अधिनियम क्र. ११ निरसित करण्यात आला.

प्रातिनिधिक वतनदार म्हणून भिन्न कुटुंबाच्या प्रमुखांची नावे नोंदणे.

(२) अशी अनेक कुटुंबे एकाच मूळ पुरुषाचे वंशज नसतील त्या बाबतीत, अशा कुटुंबाच्या प्रमुखांची नावे प्रातिनिधिक वतनदार म्हणून कलेक्टरने नोंदली पाहिजेत आणि लागोपाठच्या मुदतीने चाकरी करण्याचा प्रघात स्थापन केला पाहिजे.

एकत्रित वतनांतील प्रत्येक कुटुंबातील प्रमुखांचे नाव प्रातिनिधिक वतनदार म्हणून नोंदणे.

[१]**३०.** [२][[३] [राज्य] सरकारने] [४][वहिवाटदारांच्या] संख्येत कपात केल्यामुळे किंवा वतने एकत्रित केल्यामुळे ब्रिटीश राजवटीत लागोपाठच्या मुदतीने चाकरी करण्याचा प्रघात प्रचारात आला असेल तेव्हा, प्रत्येक कुटुंबाच्या ज्या प्रमुखाने पूर्वी वहिवाट केली असेल त्या प्रत्येक कुटुंबाच्या प्रमुखाच्या नावाची, प्रातिनिधिक वतनदार म्हणून वेगळी नोंद करण्यात आली पाहिजे.

प्रातिनिधिक वतनदार कोण याबद्दल कुटुंबाचे प्रमुख कबूल होतील तेव्हा अनुसरावयाची कार्यरीती.

[१]**३१.** परंतु, [५][* * *] कलम २९ मध्ये सांगितलेल्या कोणत्याही बाबतीत, ह्या अधिनियमात विहित केलेली नोंदवही पूर्ण होण्यापूर्वी, प्रातिनिधिक वतनदार कोण याबद्दल व चाकरीचा क्रम कोणता याविषयी कोणत्याही वेळी, कुटुंबाच्या प्रमुखांनी एकमताने लेखी कबूल केले तर, किंवा हल्लीची नोंदवही तयार करताना केलेल्या चौकशीच्या वेळी, लेखी कबूल करतील तर, या अधिनियमात विहित केलेली नोंदवही अशा कबुलायतीनुसार तयार करण्यात आली पाहिजे.

वतनी मालमत्ता सोडून दिल्यानंतर चाकरीचा हक्क राहणे.

**३२.** चाकरीचा हक्क सोडून न देता वतनी मालमत्ता किंवा तीवरील उत्पन्न आपखुशीने सोडून देण्यात आले असेल तेव्हा, अशा चाकरीसंबंधीच्या हक्काची व्यवस्था, वतनदारांना अशी उपलब्धी अजूनही मिळत होती असे समजून करण्यात येईल.

हा अधिनियम संमत होण्यापूर्वी दत्तक घेतला असेल तर अशा वारसाच्या दत्तविधानाची अधिसूचना देणे.

[१]**३३.** ज्याची प्रातिनिधिक वतनदार म्हणून नोंदणी करण्यात आली आहे अशा कोणत्याही वतनदाराने किंवा त्याच्या विधवेने, हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी, दत्तक वारस घेतला असेल त्या प्रत्येक बाबतीत त्या दत्तविधानाबाबतची अधिसूचना, हा अधिनियम अंमलात आल्यापासून बारा महिन्याच्या आत, त्या दत्तक वारसाने किंवा त्याच्या वतीने कलेक्टरला दिली पाहिजे. आणि कलेक्टरने अशा दत्तक वारसांचे नाव त्यानुसार नोंदले पाहिजे. परंतु, असे दत्तविधान सक्षम न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये रद्द करण्यात आले किंवा पुढे रद्द होईल असे दाखविण्यात आले तर कलेक्टरने, अशा नावाची नोंद काढून टाकली पाहिजे.

हा अधिनियम संमत झाल्यानंतर दत्तक वारस घेण्यात येईल तेव्हा त्या दत्तविधानाची अधिसूचना देणे.

[१]**३४.** ज्याची नोंदणी करण्यात आली आहे अशा कोणत्याही वतनदाराने किंवा त्याच्या विधवेने हा अधिनियम अंमलात आल्यानंतर दत्तक वारस घेतला असेल त्या प्रत्येक बाबतीत, त्या दत्तविधानाचे प्रतिवृत्त, तीन महिन्याच्या आत, त्या वतनदाराने किंवा त्याच्या विधवेने किंवा ते दोघेही मृत्यू पावले असतील तर अशा दत्तक वारसाने किंवा त्याच्या पालकाने कलेक्टराकडे केले पाहिजे आणि कलेक्टरने अशा वारसाचे नाव त्यानुसार नोंदले पाहिजे. परंतु असे दत्तविधान, सक्षम न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये रद्द झाले आहे

---

१ कलमे ३० व ३१ आणि ३३ व ३४ यांच्या ह्या त्याभागापुरत्या फेरबदलासंबंधी किंवा निरसनासंबंधी, सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ पहा.

२ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "सरकारने" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारने" हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ मुंबई वंशपरंपरागत पद (सुधारणा) अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ५) याच्या कलम ६ द्वारे "भागधारकांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) याद्वारे "ह्या अधिनियमाचे" हा मजकूर वगळण्यात आला.

किंवा पुढे रद्द होईल असे दाखविण्यात आले तर, कलेक्टरने अशा नावाची नोंद काढून टाकली पाहीजे.

**३५.** ह्या ठिकाणी निदेश दिल्याप्रमाणे अशा दत्तविधानाबाबतची [1][अधिसूचना किंवा] प्रतिवृत्त दिले नाही त्या प्रत्येक बाबतीत, वारसासंबंधी प्रमाणपत्र हजर केल्याखेरीज किंवा अशा दत्तविधानाची वैधता प्रस्थापित होईल असा सक्षम न्यायालयाचा हुकूमनामा हजर करण्यात येईपर्यंत, कलेक्टरने अशा दत्तविधानास मान्यता देता कामा नये.

दत्तविधानाची अधिसूचना योग्यरीत्या देण्यात न आली तर अनुसरावयाची कार्यरीती.

[2][**३६.** कोणताही प्रातिनिधिक वतनदार मृत्यू पावेल तेव्हा, त्याबाबत कलेक्टराकडे प्रतिवृत्त पाठविणे हे पाटलाचे आणि कुळकर्ण्यांचे कर्तव्य असेल आणि प्रतिवृत्ताच्या खरेपणाबद्दल खात्री झाली तर कलेक्टराने, सन १८८६ चा मुंबई अधिनियम ५, कलम २ च्या उपबंधांस अधीन राहून, अशा वतनदाराचा जवळचा वारस म्हणून जो इसम असेल त्याचे नाव, मृत वतनदाराच्या जागी नोंदले पाहिजे.

प्रातिनिधिक वतनदारांच्या मृत्युबाबत प्रतिवृत्त केले पाहिजे; वारसाचे नाव नोंदले पाहिजे.

परंतु—

(१) ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता, जवळचा वारस कोण हे ठरविताना, आनुवंशिक ज्येष्ठपणाच्या वारसाबाबत जे नियम आहेत ते नियम वतन कुटुंबात अंमलात आहेत असे गृहीत धरण्यात आले पाहिजे.

(२) मृत झालेला वतनदार हा एकमेव प्रातिनिधिक वतनदार नसेल अशा कोणत्याही बाबतीत, त्याचा अगदी जवळचा वारस हा, मृत झालेला वतनदार ज्या कुटुंबाच्या शाखेतील होता त्याच शाखेतील व्यक्ती नसून त्याच वतनाचा दुसरा प्रातिनिधिक वतनदार असेल किंवा त्याच वतनाच्या प्रातिनिधिक वतनांच्या दुसऱ्या वतनदाराच्या शाखेतील इसम असेल तर, त्या मृत झालेल्या वतनदाराच्या नावे नोंदलेला हिस्सा—

(अ) त्याच वतनाचा फक्त एकच प्रतिनिधी हयात असेल आणि तो, मृत वतनदार ज्या मूळच्या वतनदाराचा वंशज होता त्याच वतनदाराचा वंशज असेल तर, त्या हयात प्रातिनिधिक वतनदाराकडे गेला पाहिजे ;

(ब) असे हयात प्रातिनिधिक वतनदार एकापेक्षा अधिक असतील तर, अशा हयात प्रातिनिधिक वतनदारामध्ये त्यांच्या हिश्शाच्या प्रमाणात विभागण्यात आला पाहिजे आणि नोंदवहीतील नोंद त्याप्रमाणे सुधारली पाहिजे ;

(३) [3][जर कोणत्याही इसमाने सक्षम न्यायालयाचा हुकूमनामा सादर करून,] कलेक्टराने ज्या इसमाचे नाव नोंदण्याचा आदेश दिलेला आहे त्या इसमाच्या आधी मृत झालेल्या अशा वतनदाराचा अगदी जवळचा वारस म्हणून आपले नाव नोंदले जाण्याचा त्याचा हक्क आहे अशी कलेक्टरची खात्री करून देईल तर [4][असा आदेश दिल्यापासून सहा वर्षांच्या आत, कोणत्याही वेळी, कलेक्टरने मागील परंतुकांना अधीन राहून, नोंदवहीतील नोंद त्यानुसार सुधारण्याची व्यवस्था केली पाहीजे.]

---

१ मुंबई वंशपरंपरागत पद (सुधारणा) अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ५) याच्या कलम ७ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १९१० (१९१० चा मुंबई ३) याच्या कलम २ (१) द्वारे मूळ कलम ३६ ऐवजी नवीन कलम दाखल करण्यात आले.

३ सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाद्वारे, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अल्पवयीन वतनदाराची कर्तव्य त्याच्या पालकाने केली पाहिजेत.

[१]**३७.** कुटूंबाचा कोणताही प्रमुख किंवा प्रातिनिधिक वतनदार हा अठरा वर्षांहून कमी वयाचा असेल तेव्हा, ह्या अधिनियमान्वये प्रदान केलेली सर्व कर्तव्य बजाविण्याचा आणि सर्व अधिकार चालविण्याचा अधिकार [२][* * *] कलम ५१ च्या उपबंधास अधीन राहून त्याच्या पालकास आहे.

## विभाग ७

## चाकरीची मुदत

प्रातिनिधिक वतनदारांनीं तहहयात किंवा पांच किंवा दहा वर्षांच्या ठराविक मुदतीपर्यंत चाकरी करणे.

[३][**३८.** कलमे ४५ आणि ४६ च्या उपबंधास अधीन राहून, प्रातिनिधीक वतनदारांना पुढील मुदतीपर्यंत पदावर रहाण्याचा हक्क असेल (म्हणजे)—

(अ) प्रातिनिधिक वतनदारांना समकालीन पदावर राहण्याचा हक्क असेल अशा कलम २८, किंवा कलम २९, कंडिका (२), किंवा कलम ३०, किंवा कलम ३१ यांत अंतर्भूत होणाऱ्या प्रकरणांत, आणि कलम २७ किंवा कलम २८, कंडिका (१) यात अंतर्भूत होणाऱ्या प्रकरणात ; } आजीव

(ब) प्रातिनिधिक वतनदारांना लागोपाठच्या मुदतीने पदावर राहण्याचा हक्क आहे. अशी कलम २८, किंवा कलम २९ कंडिका (२), किंवा कलम ३०, किंवा कलम ३१ यात अंतर्भूत होणाऱ्या प्रकरणात. } प्रत्येक प्रकरणात कलेक्टर ठरवील अशा मुदतीपर्यंत, अशी मुदत पाच वर्षांहून कमी आणि दहा वर्षांहून अधिक असता कामा नये.]

वहिवाटदार मृत्यू पावल्यास अनुसरावयाची कार्यरीती.

[१]**३९.** वहिवाट करणाऱ्या वतनदाराची चाकरीबद्दल ठरलेली मुदत संपण्यापूर्वी तो मरण पावल्यास अशा बाबतीत, बाकी राहिलेल्या मुदतीकरिता वहिवाट करण्याचा हक्क हा, [२][* * *] भाग ८ मधील तरतुदींना अधीन राहून, त्याच्या वारसांकडे राहील.

आळीपाळीच्या वतनात वहिवाट करणारा निवडणे.

[१]**४०.** (१) ज्या वतनात वतनाची कर्तव्य लागोपाठच्या मुदतीने बजाविण्याचा हक्क प्रातिनिधिक वतनदारांना असेल त्याबाबतीत, तीं कर्तव्य बजाविण्याची पाळी अशा कोणत्याही प्रातिनिधिक वतनदारावर येईल तेव्हा एक वहिवाटदाराची निवडणूक करण्याकरिता किंवा [२][* * *] कलम ४३ च्या परंतुकान्वये कलेक्टरच्या मते आवश्यक असतील तितके वहिवाटदार निवडण्यासाठी, नेमलेल्या वेळी आणि जागी, त्यांनी कलेक्टरच्यापुढे हजर राहावे अशा मजकुराची अधिसूचना कलेक्टरने ज्यांची नोंदणी करण्यात आली आहे अशा सर्व प्रातिनिधिक वतनदारांना दिली पाहिजे.

---

१ कलमे ३७, ३९ व ४० यांच्या त्या त्या भागापुरत्या निरसनासंबंधी, सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ पहा.

२ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) याद्वारे "ह्या अधिनियमाचे" हा मजकूर वगळण्यात आला.

३ मुंबई वंशपरंपरागत पद (सुधारणा) अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ५) च्या कलम ८ द्वारे मूळ कलम ३८ ऐवजी नवीन कलम दाखल करण्यात आले. कलम ३८ च्या त्या त्या भागापुरत्या निरसनासंबंधी, सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ पहा.

(२) ज्या वतनदाराची वहिवाट करण्याची पाळी असेल त्या वतनदारांचा समावेश करून, प्रातिनिधिक वतनदारांपैकी तीन चतुर्थांशापेक्षा कमी नाहीत इतके वतनदार नेमलेल्या वेळी आणि नेमलेल्या जागी हजर होऊन त्याच वतनाचा वतनदार असणारे किंवा असणारे योग्य व लायक इसम किंवा अनेक इसम एकमताने नेमून देतील तर अशा प्रकारे नेमलेल्या इसमास किंवा इसमांना वतनासंबंधींची कर्तव्य बजाविण्याची ज्या प्रातिनिधिक वतनदारांची पाळी असेल त्यांच्या जागी त्यांच्या चाकरीच्या मुदतीपर्यंत वहिवाट करण्याचा हक्क आहे.

(३) अशा प्रकारे नेमलेला इसम किंवा नेमलेले इसम वतनाची कर्तव्य बजाविण्याची ज्या प्रातिनिधिक वतनदारांची पाळी असेल त्यांच्याखेरीज इतर व्यक्ती असेल किंवा इतर इसम असतील तर, ह्या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांकरिता, तो इसम किंवा ते इसम उक्त प्रातिनिधिक वतनदाराचा योग्यरीत्या नेमलेला प्रतिवतनदार किंवा नेमलेले प्रतिवतनदार आहेत असे समजले पाहिजे.

प्रातिनिधिक वतनदारांनी वहिवाटदार नेमून देण्यात कसूर केली तर, नेमणूक करण्याची पध्दत.

[१]**४१.** ज्या वतनांत प्रातिनिधिक वतनदारांना वतनासंबंधींची कर्तव्ये लागोपाठच्या मुदतीने बजाविण्याचा हक्क असेल त्या वतनाच्या बाबतीत, निकटपूर्वीच्या कलमान्वये नेमलेल्या वेळी आणि नेमलेल्या जागी, प्रातिनिधिक वतनदार हजर न राहतील किंवा एकमताने वहिवाटवादार नेमून देण्यात किंवा आवश्यक तितके वहिवाटदार नेमून देण्यात कसूर करतील तर, वहिवाट करण्याचा हक्क असणाऱ्या प्रातिनिधिक वतनदाराने चाकरी करण्यासंबंधींचे आणि प्रतिवतनदारांच्या नेमणुकीसंबंधींचे ह्या अधिनियमाचे उपबंध लागू होतील.

## विभाग ८

## वहिवाट करणारे वतनदार आणि प्रतिवतनदार

पदासंबंधांची कर्तव्ये प्रातिनिधिक वतनदाराने करणे.

[१]**४२.** ज्या प्रातिनिधिक वतनदाराचे वहिवाट करणे हे कर्तव्य असेल तो योग्य व लायक इसम असेल तर त्यास कलेक्टरने फर्माविले असता, त्याने वंशपरंपरागत पदासंबंधींची कर्तव्य स्वत: बजाविली पाहिजेत परंतु, कलेक्टरला त्यास प्रतिवतनदार नेमण्याची परवानगी देण्याचा अधिकार आहे.

कलेक्टरने आवश्यक असलेल्या वहिवाटदारांची संख्या ठरविणे.

[१]**४३.** कोणत्याही पदासबंधींची कर्तव्य योग्यरितीने बजाविली जाण्यासाठी, कलेक्टरने वेळोवेळी आवश्यक असणाऱ्या वहिवाटदारांची संख्या ठरविली पाहिजे आणि त्यास अशा आवश्यक गोष्टीसाठीं प्रतिवतनदार म्हणून योग्य व लायक इसम पुरेशा संख्येइतके नेमण्यास उपरिनिर्दिष्ट प्रातिनिधिक वतनदारांना फर्माविण्याचा किंवा ज्या प्रातिनिधिक वतनदारांनी आजपर्यंत चाकरी केली असेल किंवा एकाच काळी करीत असतील त्यांनी लागोपाठच्या मुदतीने चाकरी करण्याबद्दल फर्माविण्याचा अधिकार आहे.

**४४.** [वतनदार प्रतिवतनदार नेमण्यात कसूर करील तर कलेक्टरने तो नेमणे.] हे कलम सन १९१० चा मुंबई अधिनियम ३ या अन्वये रद्द करण्यात आले.

प्रातिनिधिक वतनदाराकडून किंवा त्याने नेमून दिलेल्या प्रतिवतनदाराकडून चाकरी घेण्यास कलेक्टरने केव्हा नकार द्यावा ते.

[२][[१]**४५.** कलेक्टरास, कोणताही प्रातिनिधिक वतनदार किंवा त्याने प्रतिवतनदार म्हणून नेमून दिलेल्या कोणत्याही प्रातिनिधिक वतनदाराची किंवा इतर कोणत्याही इसमाची चाकरी स्वीकारण्यास नकार देता येईल अशा प्रातिनिधिक वतनदारांची किंवा इसमाची चाकरी न स्वीकारणे हे पुढील शर्तीस अधीन असेल—

१ कलमे ४१, ४२, ४३ व ४५ यांच्या त्या त्या भागापुरत्या निरसनासंबंधी सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ पहा.

२ मुंबई वंशपरंपरागत पद (सुधारणा) अधिनियम (१८८६ चा मुंबई ५), कलम ९ द्वारे मूळ कलम ४५ ऐवजी नवीन कलम दाखल करण्यात आले.

(अ) अठरा वर्षांहून कमी वयाचा असेल असा इसम ;

(ब) [1][[2] [राज्य] सरकार] वेळोवेळी त्याबाबतीत विहित करील अशी शैक्षणिक परीक्षा जर कोणतीही असल्यास, ती उत्तीर्ण झाला नसेल, असा इसम ;

(क) ज्याने वयाची साठ वर्षे पूर्ण केली असतील असा कोणताही इसम ; परंतु, अशा इसमाच्या नेमणुकीस किंवा ती पदावर राहण्यास कलेक्टरने त्यास परवानगी दिली असेल तर त्यास ही अट लागू असणार नाही ;

(ड) कलेक्टरच्या मते, वेडेपणामुळे मानसिक दौर्बल्यामुळे, किंवा बहिरेपणामुळे, आंधळेपणामुळे किंवा इतर शारीरिक दौर्बल्यामुळे असमर्थ झाली असेल, असा इसम ;

१८७९ चा मुंबई ५. (ई) [3]मुंबई जमीन-महसूल अधिनियम, १८७९ यांत संक्षिप्त चौकशी करण्यासंबंधी जे उपबंध आहेत त्या उपबंधान्वये संक्षिप्त चौकशी केल्यानंतर, जे सामान्यतः वाईट चालीची आहे असे कलेक्टरने ठरविले असेल, असा इसम;

[4][(ईई) जमीन महसुलाच्या बाबतीत किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विधिन्वये जी रक्कम-जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करावी असे स्पष्टपणे ठरविले असेल ती रक्कम देण्यांत जाणून बुजून कसूर केल्यामुळे त्या कारणावरुन जी पदास अपात्र आहे असे कलेक्टरला वाटेल, असा इसम;]

(फ) ज्या अपराधाबद्दल सहा महिन्यापेक्षा अधिक मुदतीची किंवा जन्मठेपेची शिक्षा देता येईल, अशा अपराधाबद्दल ज्या इसमास फौजदारी न्यायालयाने कैदेची किंवा फटक्यांची शिक्षा दिली असेल, आणि अशी शिक्षा त्यानंतर फिरविण्यास किंवा रद्द करण्यात आली नाही, आणि अशा शिक्षेमुळे पात्र झालेली त्याची अपात्रता, [5][कमिशनरकडून] जर त्यास योग्य वाटेल अशा याबाबतीत जो आदेश देण्याचा त्यास अधिकार आहे अशा आदेशान्वये दूर करण्यात आली नसेल ;

(प) पदासंबंधीची कर्तव्य योग्य रितीने बजाविण्यास जी नोकरी कलेक्टरच्या मते विसंगत असेल अशी इतर कोणतीही नोकरी, वहिवाट करीत असता, जी सोडून देण्याचे नाकारील, असा इसम;

[6][(ह) कलम ५८ अन्वये ज्यास पदावरून काढून टाकण्यात आले असेल किंवा ज्यास त्याची पुन्हा नेमणूक करण्यात अपात्र ठरविले आहे असा कोणताही इसम ; परंतु अशा इसमाची पुन्हा नेमणूक करण्यास [5][कमिशनरने] मंजुरी दिली असेल, तर त्यास ही अट लागू असणार नाही.]

प्रातिनिधिक वतनदाराचा वहिवाटदार किंवा प्रतिवतनदार वहिवाट करण्यास अयोग्य झाल्यास त्याला पदावरुन दूर करण्याचा अधिकार.

[7][[8] **४६.** कलम ४५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणामुळे, वहिवाटदार वहिवाट करण्यास अयोग्य झाला तर, कलेक्टरने त्याला पदावरून दूर केले पाहिजे आणि ह्या विभागांतील इतर उपबंधास अधीन राहून दुसरा वहिवाटदार नेमला पाहिजे.

प्रातिनिधिक वतनदाराने नेमलेल्या प्रतिवतनदारास, प्रातिनिधिक वतनदाराने विनंती केल्यास आणि कलेक्टरच्या मते ज्या कारणावरून अशी विनंती करण्यात येत असेल ती कारणे योग्य असतील तर, त्यास कोणत्याही वेळी पदावरून दूर करण्याचा अधिकार आहे.]

---

१ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे ''सरकार'' या मजकुराऐवजी ''प्रांतिक सरकार'' हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे ''प्रांतिक'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ infra.

४ मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १९१० (१९१० चा मुंबई ३), च्या कलम २ द्वारे खंड (ई ई) समाविष्ट करण्यात आले.

५ सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्र. ८ कलम ३, अनुसूची याद्वारे ''राज्य सरकार'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम,१९१० (१९१० चा मुंबई ३), च्या कलम २ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आले.

७ मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १९१० (१९१० चा मुंबई ३), च्या कलम २ द्वारे मूळ कलम ४६ ऐवजी नवीन कलम दाखल करण्यात आले.

८ कलम ४६ च्या त्या त्या भागापुरत्या निरसनांसंबंधी सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्र. ६ पहा.

[1][2]**४७.** वहिवाट करणे हे ज्याचे कर्तव्य असेल अशा प्रातिनिधिक वतनदाराला, कलम ४५ किंवा ४६ अन्वये नकार दिला असेल किंवा काढून टाकले असेल तर, त्यास कलम ४९ च्या उपबंधास अधीन राहून प्रतिवतनदार नेमण्याचा अधिकार आहे : प्रातिनिधिक वतनदारास नकार दिला किंवा पदावरुन दूर करण्यात आले असेल तेव्हा अनुसरावयाची कार्यरीती.

परंतु, असा प्रातिनिधिक वतनदार कलम ४५ अन्वये अपात्र असण्याचे बंद होईल तेव्हा, त्यास तो अन्यथा लायक असेल तर, अशा कोणत्याही प्रतिवतनदारास काढून टाकल्यावर त्याच्या जागी स्वतः जातीने चाकरी करण्याचा, किंवा कलेक्टराने नेमलेल्या कोणत्याही प्रतिवतनदारास काढून टाकण्यात आल्यावर त्याच्या जागी स्वतः जातीने चाकरी करण्याचा किंवा (कलम ४२ च्या उपबंधास अधीन राहून) कलेक्टराने नेमलेल्या कोणत्याही प्रतिवतनदारास काढून टाकण्यात आल्यावर त्याच्या जागी दुसरा प्रतिवतनदार नेमण्याचा अधिकार आहे.]

[1][2]**४८.** प्रतिवतनदार मरण पावल्यास किंवा त्याने राजीनामा दिला, किंवा कलेक्टराने त्याला कलम ४५ किंवा ४६ अन्वये नकार दिला किंवा काढून टाकले असेल तर, ज्या प्रातिनिधिक वतनदाराचे वहिवाट करणे हे कर्तव्य असेल तो अन्यथा लायक असेल तर, त्याला स्वतःला अशा प्रतिवतनदाराच्या जागी चाकरी बजाविण्याचा, किंवा कलमे ४२ आणि ४९ च्या उपबंधांस अधीन राहून, दुसरा प्रतिवतनदार नेमण्याचा अधिकार आहे.] प्रतिवतनदारास नकार दिला किंवा त्याने वहिवाट करण्याचे बंद केले असेल तेव्हा अनुसरावयाची कार्यरीती.

[1][2]**४९.** ज्या प्रातिनिधिक वतनदाराचे वहिवाट करणे हे कर्तव्य असेल त्याच्या ऐवजी, कलेक्टराने, पुढील पैकी कोणत्याही बाबतीत, प्रतिवतनदार नेमला पाहिजे :— कोणत्या बाबतीत प्रातिनिधिक वतनदाराच्या ऐवजी कलेक्टराने प्रतिवतनदार नेमला पाहिजे.

(अ) प्रातिनिधिक वतनदार वेडेपणामुळे किंवा मानसिक दौर्बल्यामुळे प्रतिवतनदार नेमण्यास असमर्थ झाला असेल ;

(ब) प्रातिनिधिक वतनदार कलम ४५, कंडिका (ई) (फ) किंवा (ह) अन्वये अपात्र ठरविला असेल तेव्हा, मग अशी अपात्रता त्यात प्राप्त झाली त्या वेळी तो प्रातिनिधिक वतनदार असो किंवा नसो ;

(क) कलमे ४२, ४३, ४७ किंवा ४८ अन्वये प्रातिनिधिक वतनदार यास स्वत : जातीने चाकरी करण्याविषयींच्या किंवा प्रतिवतनदार नेमण्याविषयी कलेक्टरने फर्माविले असता असा कोणताही आदेश ज्या तारखेस देण्यात आला त्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत, त्या आदेशान्वये आवश्यक ती वहिवाट करण्यात कसूर करील तेव्हा ;

(ड) प्रातिनिधिक वतनदाराने नेमून दिलेला पहिला इसम कलम ४५ अन्वये नाकारला असून दुसरा इसमही त्या कलमान्वये नाकारला असेल तेव्हा ;

(ई) प्रातिनिधिक वतनदाराने कलम ५३ अन्वये एखाद्या इसमास त्याचा प्रतिवतनदार म्हणून नेमण्यात नकार दिला असेल तेव्हा ;

---

१ मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १९१० (१९१० चा मुंबई ३) याच्या कलम २ द्वारे मूळ कलमे ४७, ४८ व ४९ ऐवजी नवीन कलमे दाखल करण्यात आली.

२ कलमे ४७ ते ४९ यांच्या त्या त्या भागापुरत्या निरसनासंबंधी सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्र. ६ पहा.

(फ) कलेक्टराने वरीलपैकी कोणत्याही कंडिकेअन्वये नेमलेला प्रतिवतनदार मरण पावेल किंवा राजीनामा देईल तेव्हा. ]

**५०.** [प्रातिनिधिक वतनदार नाकारण्यात येईल किंवा त्याला काढून टाकण्यात येईल तर, कलेक्टरला, प्रतिवतनदार नेमून देण्याचा अधिकार आहे.] हे कलम सन १९१० चा मुंबई अधिनियम ३ या अन्वये रद्द करण्यात आले.

स्त्रीला वहिवाट करता येणार नाही परंतु प्रतिवतनदार नेमून देण्याचा अधिकार आहे.

[१]**५१.** कोणत्याही स्त्रीने कोणत्याही वंशपरंपरागत पदासंबंधीची कर्तव्य बजाविता कामा नयेत ; परंतु, प्रातिनिधिक वतनदार किंवा प्रातिनिधिक वतनदाराचा पालक या नात्याने प्रतिवतनदाराची नेमणूक करण्याचा अधिकार तिला आहे.

वहिवाटदार कामावरून तात्पुरता कमी झाला असेल तेव्हा, मामलतदारानें किंवा महालकऱ्यानें प्रतिवतनदार नेमणे.

[१]**५२.** वहिवाट करणाऱ्या प्रातिनिधिक वतनदारास किंवा प्रतिवतनदारास कामावरुन तात्पुरते दूर केले असेल त्या मुदतीत, कोणतीही जागा रिकामी असेल त्या मुदतीत, [२][यथास्थिति, मामलतदाराने किंवा महालकऱ्याने] नेमलेल्या बदली इसमाने, मग तो वतनदार असो किंवा नसो, कर्तव्ये तात्पुरत्या मुदतीकरता बजाविली पाहिजेत.

प्रतिवतनदार ही व्यक्ती सामान्यतः ज्या प्रातिनिधिक वतनदाराने वहिवाट करावयाची असेल, त्याच्याच घराण्यातील असली पाहिजे.

[३][[१]**५३.** निकटपूर्वीच्या कलमांत आणि कलम ५६ मध्ये अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून आणि [४][[५] [राज्य] सरकार] सामान्य किंवा विशेष आदेशान्वये वेळोवेळी अन्यथा निदेश देईल ते खेरीजकरून, ह्या अधिनियमान्वये नेमलेला प्रत्येक प्रतिवतनदार, ही व्यक्ती ज्या प्रातिनिधिक वतनदाराने वहिवाट करणे आहे तो प्रातिनिधिक वतनदार ज्या घराण्यातील असेल त्या घराण्यातील एखादी व्यक्ती वहिवाट करण्यास योग्य असेल आणि राजी असेल तर, याच घराण्यातील व्यक्ती असली पाहिजे [६][किंवा अशी कोणी व्यक्ती नसल्यास, ज्या प्रातिनिधिक वतनदाराचे वहिवाट करणे हे कर्तव्य असेल त्याच्याच मूळ वतनदाराचा वंशज असणारा आणि त्याच वतनाचा असणारा असा योग्य व राजी असणारा वतनदार असला पाहिजे.]

[७][* * *]

प्रतिवतनदाराच्या नेमणुकीची मुदत.

[१]**५४.** कलेक्टर प्रतिवतनदाराची नेमणूक करील ती नेमणूक पाच वर्षांपेक्षा अधिक मुदतीसाठी करता कामा नये.

वहिवाट करण्याचा हक्क असणारा वतनदार प्रतिवतनदार याची नेमणूक करील तेव्हा, ती नेमणूक तह्यात असली पाहिजे किंवा पाच वर्षांपेक्षा कमी मुदतीची नसली पाहिजे. प्रतिवतनदाराच्या नेमणुकीची मुदत, त्याच्या प्रमुखाचा हक्क समाप्त झाला म्हणजे किंवा प्रमुख मृत्यू पावला म्हणजे समाप्त होईल.

---

१ कलमे ५१ ते ५४ यांच्या त्या त्या भागापुरत्या निरसनांसंबंधी सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्र. ६ पहा.

२ मुंबई विकेंद्रीकरण अधिनियम, १९१५ (१९१५ चा मुंबई ३) याचे कलम २ व अनुसूची एक द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ मुंबई वंशपरंपरागत पद (सुधारणा) अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ५) याच्या कलम १२ द्वारे मूळ कलम ५३ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

४ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे ''सरकार'' या मजकुराऐवजी ''प्रांतिक सरकार'' हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे ''प्रांतिक'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, (१९१० चा मुंबई ३) याच्या कलम २ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

७ सन १९१० चा मुंबई अधिनियम क्र. ३ याद्वारे मूळ परिच्छेद वगळण्यात आला.

व संपुष्टात येईल आणि अठरा वर्षांहून कमी वयाच्या प्रातिनिधिक, वतनदाराच्या वतीने नेमलेल्या प्रति-वतनदाराची नेमणूक तो प्रातिनिधिक वतनदार वयात आल्यावर संपुष्टात आली पाहिजे.

[१]**५५.** वहिवाटदार तात्पुरता गैरहजर किंवा आजारी असल्याच्या बाबतीत, तात्पुरत्या मुदतीकरिता कर्तव्य पार पाडता यावीत म्हणून त्यास कोणत्याही लायक इसमाची व्यवस्था करण्याचा अधिकार आहे, परंतु [२][* * *] कलमें ५७ ते ६१ यात विहित केलेल्या शास्तींना अधीन असला पाहिजे.

वहिवाटदार गैरहजर किंवा आजारी असला तर, त्यास, तात्पुरता बदली नेमण्याचा अधिकार आहे.

[१]**५६.** मूळ वतनदाराचा प्रतिवतनदार म्हणून वंशपरंपरागत पदासंबंधीची कर्तव्ये बजाविण्याचा वंशपरंपरागत हक्क, मूळ वतनदाराच्या कुटुंबाहून वेगळ्या कुटुंबांकडे निहित झालेला असेल तेव्हा, तो रिवाज, मान्य केला पाहिजे, आणि कर्तव्य करण्याचा हक्क असणाऱ्या कुटुंबांच्या प्रमुखांची नावे नोंदून त्यांना प्रातिनिधिक वतनदार म्हणून समजण्यात आले पाहिजे.

कुटुंब प्रमुखास वतनदार केव्हा समजावे.

## विभाग ९
## शास्ती

[१]**५७.** आरोपित गैरवर्तनाबाबतची चौकशी चालू असताना कोणत्याही वहिवाटदारास कलेक्टरने पदावरून तात्पुरते दूर करणे आणि अशा कोणत्याही वहिवाटदरास, गैरवर्तनाबद्दल किंवा कर्तव्ये करण्यात हयगय केल्याबद्दल पराकाष्ठा सहा महिनेपर्यंत पदावरून दूर करणे, किंवा वहिवाटदारासाठी तरतूद केलेल्या वार्षिक उपलब्धींचा पराकाष्ठा चतुर्थांश भाग दंडादाखल घेणे हे विधीसंमत असेल जिल्हा वंशपरंपरागत अधिकाऱ्यास शिक्षा केली असेल ती खेरीज करुन, अशा इतर प्रकरणांत कलेक्टरने दिलेला आदेश अखेरचा असेल.

वहिवाटदारांस शिक्षा.

[१]**५८.** लबाडी, जाणूनबुजून खोट्या नोंदी करणे, कर्तव्ये बजाविण्यात सराईतपणे हलगर्जीपणा करणे, किंवा वहिवाटदारांने केलेल्या इतर गंभीर गैरवर्तनाच्या बाबतीत, [३][[४][राज्य] सरकारची] पूर्वमंजुरी घेऊन कलेक्टर, अशा वहिवाटदारास पदावरून दूर करणे [५][किंवा तो वहिवाट करण्याचे बंद झाला असेल तर, तो [३][[४]राज्य] सरकारच्या] मंजुरीवाचून कोणत्याही वंशपरंपरागत पदावर पुन्हा नोकरीस ठेवला जाण्यास अपात्र आहे असे जाहीर करणे,] हे विधीसंमत असेल.

कलेक्टरला, राज्य सरकारच्या मंजुरीनें, वहिवाटदारास काढून टाकण्याचा अधिकार आहे.

**५९.** [पदावरून दूर केलेला वहिवाटदार पुन्हा नोकरीवर घेतला जाण्यास अपात्र असणे.] हे कलम सन १९१० चा मुंबई अधिनियम ३ याअन्वये रद्द करण्यात आले.

---

१ कलमे ५५ ते ५८ यांच्या त्या त्या भागापुरत्या निरसनासंबंधी सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्र. ६ पहा.

२ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) याद्वारे "ह्या अधिनियमाची" हा मजकूर वगळण्यात आला.

३ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "सरकार" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकार" हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे ''प्रांतिक'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १९१० (१९१०चा मुंबई ३) याच्या कलम २, द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२][३][राज्य] सरकारला] वतन जप्त करण्याचा निदेश देण्याचा अधिकार आहे.

**६०.** [१][कोणताही प्रातिनिधिक वतनदार किंवा त्याने नेमलेला कोणताही प्रतिवतनदार किंवा बदली वतनदार, यांना आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यासंबंधीच्या अपराधाबद्दल, किंवा दुसऱ्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या अपराधांपैकी कोणत्याही अपराधाबद्दल, किंवा अशा कोणत्याही अपराधास प्रोत्साहन दिल्याबद्दल, सेशन न्यायालयापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या अशा कोणत्याही फौजदारी न्यायालयाकडून दोषी ठरविण्यात आले असेल, आणि अशी दोषसिध्दी त्यानंतर फिरविली नसेल किंवा रद्द केली नसेल तेव्हा, [२][[३] [राज्य] सरकारास], [४][***]

[४][ (अ) त्याची अधिकृत कर्तव्ये पार पाडण्यासंबंधी, किंवा दुसऱ्या अनुसूचीतील (२) ते (६) मध्यें गणना केलेल्या अपराधांपैकी एखादा अपराध असल्यास ज्या इसमास दोषी ठरविण्यात आले असेल त्या इसमाचा किंवा तो प्रातिनिधिक वतनदार नसेल तर, प्रातिनिधिक वतनदाराचा हितसंबंध जप्त करण्याबद्दल, निदेश देण्याचा अधिकार आहे ;

(ब) अपराधाचे स्वरूप भारतीय दंड प्रक्रिया संहिता, विभाग ६ मध्ये वर्णन केलेल्या प्रकारचे असेल तर, ज्या कोणत्याही वतनांत त्याचा हितसंबंध असेल ते सगळे वतन किंवा त्याचा कोणताही भाग जप्त करण्याबद्दल निदेश देण्याचा अधिकार आहे. अशी जप्ती कायमची किंवा राज्य सरकारला वाजवी वाटेल तितक्या मुदतीची असेल.]

प्रतिवतनदाराच्या गैरवर्तनाबद्दल वहिवाटदाराचा आणि प्रतिवतन-दाराचा हितसंबंध तहहयात जप्त करणे.

[५]**६१.** प्रातिनिधिक वतनदार वहिवाट करीत असता स्वत: त्यास जे नियम व ज्या शास्ती लागू आहेत तेच नियम आणि त्याच शास्ती, या अन्यथा जी कोणतीही तरतूद केली असेल ती खेरीजकरून, ह्या अधिनियमान्वये नेमलेल्या सर्व प्रतिवतनदारांना ते त्यांच्या पदासंबंधींची कर्तव्ये बजावीत असता, लागू असतील, आणि ह्या अधिनियमाचे कलम ५८ यात निर्दिष्ट केलेल्या बाबतींत, गैरवर्तनाबद्दल दोषी असलेला वहिवाटदार हा, वतनाची वहिवाट करण्याचा हक्क असणारा प्रातिनिधिक वतनदार असो किंवा त्याने नेमलेला प्रतिवतनदार असो [२][[३] [राज्य] सरकारने] त्या प्रातिनिधिक वतनदाराचा वतनांतील तहह्यात हितसंबंध जप्त करण्याबद्दल निदेश देणे हे विधीसंमत असेल.

[६][परंतु, अशा रीतीने ज्या इसमाविरूद्ध अपराध सिद्ध झाला असेल किंवा जो अशा रीतीने दोषी असल्याचे आढळून आले असेल अशा इसमाखेरीज इतर कोणत्याही इसमास, त्या अपराधाची किंवा गैरवर्तनाची आगाऊ माहिती होती किंवा त्या अपराधाकडे किंवा गैरवर्तनाकडे त्याने डोळेझाक केली अशी [७][त्याची] [राज्य सरकारची] खात्री होईल अशा रीतीने सिद्ध झाल्यावाचून, त्या इसमाच्या मालकीचे कोणतेही वतन किंवा त्याचा कोणताही भाग ह्या कलमान्वये किंवा निकट पूर्वीच्या कलमान्वये जप्त करण्याचा निदेश [२][[३] [राज्य] सरकाराने] देता कामा नये.

चौकशी केल्यानंतर आदेश देणे.

[८]**६२.** न्यायालयाचे कोणतेही निकालपत्र [९][असल्यास तें] पाहिल्यावाचून ह्या कलमान्वये कोणताही आदेश देता येणार नाही [८][आणि तो आदेश, ज्या पक्षकाराविरूद्ध देण्याचे योजिले असेल त्या पक्षकारास त्याचे स्वत:चे किंवा त्याच्या वतीने त्याच्या वकिलाचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी ज्या तपासणीत देण्यात आली असेल अशी लेखी तपासणी केल्यावाचून देता कामा नये.]

## विभाग १०
## ग्राम वंशपरंपरागत कनिष्ठ पदे

विभाग १० लागू करणे.

**६३.** पाटील किंवा कुळकर्णी यांच्या दर्जाहून कमी दर्जा असणाऱ्या गाव वंशपरंपरागत पदांनाच हा विभाग लागू आहे.

कलेक्टरास दिलेले अधिकार.

**६४.** [९][(१)] [२][[३] [राज्य] सरकारच्या] साधारण नियंत्रणास अधीन राहून, कलेक्टरास गोष्टींबाबत अधिकार देण्यात आला आहे :—

---

१ मुंबई वंशपरंपरागत पद (सुधारणा) अधिनियम,१८८६ (१८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५) याच्या कलम १३ द्वारे कलम ६० दाखल करण्यात आला. कलम ६० मधील स्थानसापेक्ष फेरबदलासाठी १९८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ पहा.

२ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशाद्वारे 'गव्हर्नमेंट इन कौन्सिल' या मजकुराऐवजी 'प्रांतिक सरकार' हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतिक' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला आणि खंड (अ) व (ब) समाविष्ट करण्यात आले.

५ कलमे ६१ व ६२ यांच्या त्या त्या भागापुरत्या निरसनासंबंधी सन १९८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ पहा.

६ सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३ द्वारे कलम ६१ मध्ये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

७ वरील अधिनियमाद्वारे 'राज्य सरकारची' या मजकुराऐवजी इंग्रजीतील 'इट्स' हा मजकूर दाखल करण्यात आला.

८ कलमे ६१ व ६२ यांच्या त्या त्या भागापुरत्या निरसनासंबंधी सन १९८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ पहा.

९ सन १९२५ मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(अ) पद धारण करणाऱ्या वैयक्तिक वतनदार इसमांची नावे नोंदणे, किंवा वतनदारांच्या समूहाने धारण केले आहे म्हणून त्यांची नावे नोंदणे;

(ब) वैयक्तिक नावे नोंदल्यावर अशा नोंदलेल्या इसमाचे आपसातील हक्क, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या ठरविणे आणि कर्तव्य बजाविण्यासाठी त्यांची ज्या पद्धतीने निवड करण्यात येईल ती पद्धत ठरविणे, मग ती पद्धत इष्ट असेल त्याप्रमाणे कलेक्टरने निवड करून किंवा ठरविण्यात आलेल्या आळी-पाळीने निवड करून किंवा वतनदारांनी निवड करुन किंवा इतर प्रकारे निवड करून ठरविणे ;

(क) वतनदारांच्या समूहाच्या नावाने नोंदणी केली असेल अशा बाबतींत, त्यांनी संयुक्तपणे व पृथकपणे करावयाची म्हणून जी कर्तव्ये त्यांच्याकडे नेमून दिली असतील ती करण्यासाठी आवश्यक असतील तितके योग्य इसम नेमण्यास त्यांना फर्माविणे; अशी नेमणूक, कलेक्टरने आगाऊ ठरवून त्याप्रमाणे त्यांना अधिसूचना दिल्याप्रमाणे वाजवी मुदतीच्या आत केली पाहिजे. अशी नेमणूक करण्यात कसूर झाल्यास, कलेक्टरला ती स्वत: करण्याचा अधिकार आहे ;

(ड) त्यांच्यापैकी कोणी किंवा त्यांच्या प्रतिनिधींपैकी कोणीही कर्तव्य पार पाडण्यात हयगय केली किंवा गैरवर्तन केले तर, संबंध समूहास समाईकरीत्या जबाबदार धरण्याविषयी तरतूद करणे आणि ती अंमलात आणणे आणि गुराढोरांना विष घालण्याचा अपराध प्रचारात असेल त्या बाबतीत, ज्या इसमाने तो अपराध केला आहे असा संशय घेण्यास कारण असेल त्या इसमांची वतने, [१][[२][राज्य] सरकारची] मंजुरी घेऊन आणि [१][[२][राज्य] सरकारच्या] मर्जीस येईल तितक्या मुदतीपर्यंत जप्त करणे ;

[३][(ई) वहिवाट करणाऱ्या इसमांना पदच्युत करण्यासंबंधी आदेश देणे ;]

[४][(फ) वहिवाट करणे हे ज्याचे कर्तव्य असेल अशा वतनदारास, त्याच्या पदासंबंधीची कर्तव्य बजाविण्यासाठीं प्रतिवतनदार नेमण्यास परवानगी देणे.]

कलेक्टरने नोंदणी पुस्तकांतील नोंद सुधारणे.

[५][(२) कलेक्टरची जेव्हा खात्री होईल की, सक्षम न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश सादर करणारा कोणताही इसम ही, नोंदणी पुस्तकात मयत वतनदाराचा अगदी जवळचा वारस म्हणून पूर्वीच ज्या इसमाच्या नावाची नोंद करण्यात आली असेल त्या इसमाऐवजी, त्या वतनदाराचा अगदी जवळचा वारस म्हणून त्याच्या नावाची नोंदणी पुस्तकात नोंद केली जाण्यास हक्कदार आहे तेव्हा त्याने उक्त नोंदणी पुस्तकातील उक्त नोंद त्याप्रमाणे सुधारली पाहिजे. परंतु उक्त आदेश किंवा उक्त हुकूमनामा, उक्त नोंदणी-पुस्तकांतील जी नोंद सुधारावयाची असेल त्या नोंदीच्या तारखेपासून सहा वर्षांच्या आत सादर केला पाहिजे.]

कलेक्टरास विवक्षित अधिकार मामलतदार आणि महालकरी यांच्याकडे सोपवून देण्याचा अधिकार आहे.

[५][(३) कलेक्टरास, त्याने पोट-कलम (१), कंडिका (अ) अन्वये चालवावयाचे अधिकार, मामलतदार किंवा महालकरी यांच्याकडे सोपवून देण्याचा अधिकार आहे.]

मामलतदार आणि महालकरी यांना दिलेले अधिकार.

[६][(४) मामलतदार व महालकरी यांना, वहिवाट करणाऱ्या इसमांची नेमणूक, त्याचे पारिश्रमिक, त्यांच्या चाकरीची मुदत, त्यांना तात्पुरते दूर करणे किंवा दंड करणे, त्यांना गैरहजर राहण्याची रजा देणे, आणि हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असणारा इतर कोणताही विधी यात शिस्तविषयक ज्या कोणत्याही इतर गोष्टींसाठी स्पष्टपणे तरतूद करण्यात आली नसेल अशा गोष्टींबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे.]

---

१ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशाद्वारे 'गव्हर्नमेंट' या मजकुराऐवजी 'प्रांतिक सरकार' हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतिक' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ मुंबई विकेंद्रीकरण अधिनियम, १९१५ (सन १९१५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) याच्या कलम २ व अनुसूची एक द्वारे खंड (ई) समाविष्ट करण्यात आला.

४ सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ द्वारे खंड (फ) समाविष्ट करण्यात आला.

५ सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम २ द्वारे पोट कलमे (२) व (३) समाविष्ट करण्यात आली.

६ सन १९१५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २ व अनुसूची याद्वारे जादा दाखल करण्यात आलेल्या पोट कलम (२) यास त्याच अधिनियमाद्वारे पोट कलम (४) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

## विभाग ११
## नोंदणी पुस्तक

कलेक्टरने नोंदणी पुस्तक तयार करुन ठेवणे.

**६५.** ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता आवश्यक असणारी सर्व नोंदणी पुस्तके, [१][[२] [राज्य] सरकार] वेळोवेळी, विहित करील अशा नमुन्यांप्रमाणे कलेक्टरने ती तयार करून ठेवलीं पाहिजेत. ज्या जमिनींच्या आणि भत्याच्या ऐवजी चाकरी करण्याची जबाबदारी अस्तित्वात असेल त्या जमिनीचे आणि भत्यांचे एक नोंदणी पुस्तक असले पाहिजे आणि ज्या जमिनींबाबत आणि भत्यांबाबत अशी जबाबदारी अस्तित्वात नसेल त्यांचे दुसरे नोंदणी पुस्तक असले पाहिजे.

बिनचाकरी विषयक असलेल्या नोंदणी पुस्तकात कोणत्या गोष्टी नमूद करण्यात येतील ते.

**६६.** ज्या जमिनींच्या किंवा भत्त्यांच्या धारकांना चाकरी करण्याची माफी असेल त्या जमिनींच्या व भत्त्यांच्या नोंदणी पुस्तकांत, कलेक्टरने पुढील मजकूर निर्दिष्ट केला पाहिजे :—

(अ) जमिनीचे क्षेत्रफळ, भूमापन क्रमांक आणि आकारणी, बसविता येण्याजोगा उक्ता धारा, आणि [३][सरकारने] दुमाला करून दिलेला निव्वळ महसूल ;

(ब) रोकड किंवा इतर भत्त्याची रक्कम आणि तिचा प्रकार, आणि ती ज्या साधनांद्वारे देणे असेल ती साधने ;

(क) ज्या तडजोडीन्वये माफी मिळालेली असेल त्या तडजोडीच्या अटी ;

(ड) [३][सरकार] बरोबर झालेल्या अशा तडजोडीतील पक्षकारांची, त्यांना दिलेल्या सनदेत दर्शविली असतील ती नांवे ;

(ई) [१][[२] [राज्य] सरकार], वेळोवेळी नोंद करण्याचा आदेश देईल असा इतर तपशील.

चाकरीबद्दलच्या नोंदणी पुस्तकात कोणत्या गोष्टी नमूद करण्यात येतील ते.

[४]**६७.** ज्या जमिनींच्या आणि भत्त्यांच्या ऐवजी चाकरी करण्याची जबाबदारी अद्यापि अस्तित्वात आहे त्या जमिनींबाबतच्या आणि भत्त्यांबाबतच्या नोंदणी पुस्तकात, कलेक्टरने पुढील मजकूर निर्दिष्ट केला पाहिजे :—

(अ) जमिनींचे क्षेत्रफळ, खातेदारांची नावे, भूमापन क्रमांक आणि आकारणी बसविता येण्याजोगा उक्ता धारा, कोणताही असल्यास तो, आणि [३][सरकारने] दुमाला करून दिलेला निव्वळ महसूल, रोकड किंवा इतर भत्त्याची रक्कम आणि तिचा प्रकार, तो ज्या साधनांतून देणे असेल ती साधने आणि वहिवाटदारांना त्यांचे पारिश्रमिक म्हणून ज्या जमिनी आणि भत्ते नेमून दिलेले असतील त्या जमिनी आणि असे भत्ते ;

(ब) कुटुंबांच्या प्रमुखांची आणि प्रातिनिधिक वतनदारांचीं नावे ;

(क) चाकरी एकच प्रातिनिधिक वतनदार करतो किंवा कसे ; जर अनेक इसम लागोपाठच्या मुदतीने करीत असतील तर, त्यांच्या मुदतीचा क्रम ;

(ड) कुटुंबाच्या प्रत्येक प्रमुखाच्या कब्जांत, वतनाचा प्रमाणशीर हिस्सा असेल तो, अशा हिस्सा आण्यात किंवा रूपयाच्या भागात दर्शविण्यात आला पाहिजे ;

(ई) कर्तव्य करण्यासाठीं आवश्यक असलेल्या वहिवाटदारांची संख्या ;

(फ) [५][* * *] विभाग १० मध्ये उल्लेखिलेल्या कनिष्ठ गाव वतनांच्या तडजोडीचे स्वरुप ;

(न) [१][[२] [राज्य] सरकार] वेळोवेळी नोंदण्याविषयी आदेश देईल असा इतर तपशील ;

नोंदणी पुस्तकात दुरुस्ती करणे.

**६८.** ह्या अधिनियमाच्या उपबंधानुसार उपरिनिर्दिष्ट तपशिलात जो कोणताही बदल करण्यात येईल त्याप्रमाणे, ह्या अधिनियमान्वये ठेवलेल्या नोंदणी पुस्तकात दुरूस्ती केली पाहिजे किंवा त्यात वाढ केली पाहिजे.

---

१ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे 'प्रांतिक सरकार' या मजकुराऐवजी 'सरकार' हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतिक' या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे 'बादशहा' या मजकूराऐवजी 'सरकार' हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ कलम ६७ यांच्या त्या त्या भागापुरता निरसनासंबंधी सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ पहा.

५ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे 'ह्या अधिनियमाचा' हा मजकूर निरसित करण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ चा १ याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

## विभाग १२
## संकीर्ण

वतनदारांनी बजवावयाची चाकरी.

[१]**६९.** कोणत्याही नांवाने ओळखण्यात येणाऱ्या ज्या कोणत्याही वतनदारांचा चाकरी करण्याच्या जबाबदारीचा मोबदला ठरविला नसेल त्यांनी, ह्या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, वहिवाटीनुसार किंवा विधिन्वये आवश्यक असलेली चाकरी करणे हे त्यांजवर वैधरित्या बंधनकारक असेल.

वतनासंबंधीची दप्तरे ही [६][सरकारची] मालमत्ता असणे.

[२]**७०.** कोणत्याही वतनदाराने किंवा वंशपरंपरागत पदावरील कोणत्याही वहिवाटदाराने, पदासंबंधीची कर्तव्ये करीत असता, किंवा वरिष्ठ अधिकाऱ्याच्या किंवा पूर्वीच्या किंवा हल्लीच्या सरकारच्या आदेशान्वये, जी दफ्तरे तयार केली असतील किंवा तयार करण्यात येतील ती सर्व, दप्तरे [३][[४][राज्य सरकारच्या] मालकीची] आहेत असे या अन्वये जाहीर करण्यात येत आहे, आणि [५][मामलतदारास किंवा महालकऱ्यास,] मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९, कलमे २५ आणि २६ च्या उपबंधांनुसार ती हजर करण्यास किंवा वतनदाराच्या किंवा वहिवाटदाराच्या कब्जांतील राज्य सरकारची दफ्तरे सादर करण्यास भाग पाडण्याचा अधिकार आहे.

१८७९ चा मुंबई ५.

गावच्या दफ्तरावर सही करण्याचा अधिकार वतनदारास आहे.

**७१.** पाटील किंवा कुळकर्णी यांच्या पदाहून कमी दर्जाच्या नसलेल्या वंशपरंपरागत पदांच्या बाबतीत, या अन्वये असे जाहीर करण्यात आहे की, कुटुंबाच्या प्रत्येक प्रमुखाने गावच्या ज्या जमिनीविषयक आणि महसूलविषयक गोषवाऱ्यावर किंवा गावच्या इतर कागदपत्रांवर सही करण्याचा रिवाज असेल त्यावर सही करण्याचा त्यास अधिकार आहे.

## विभाग १३
## कामकाजाची रीत आणि अपिले

साक्षीपुरावा घेणे.

**७२.** (१) कलेक्टरने किंवा इतर अधिकाऱ्याने, ह्या अधिनियमान्वये तपासाचे काम करीत असता साक्षीपुरावा घेणे हे विधीसंमत असेल आणि [७]भारतीय दंड संहिता, कलमे १९३ आणि २२८, यांतील ''न्यायसंबंधी कामे'' या शब्दात, ह्या अधिनियमान्वये चालविलेल्या कोणत्याही कामकामकाजाचा समावेश होतो, असे समजण्यात आले पाहिजे.

१८६० चा ४५.

(२) कलेक्टरने किंवा इतर अधिकाऱ्याने, ह्या अधिनियमान्वये ते चौकशी करण्याचे काम करीत असता, ज्या इसमास साक्षीपुरावा देण्यासाठी किंवा त्याच्या कब्जांतील लेख सादर करण्यास आज्ञापत्र काढून बोलविले असेल त्या प्रत्येक इसमाने हजर राहणे, किंवा असा लेख सादर करणे हे त्याजवर वैधरीत्या बंधनकारक असेल.

चौकशी केल्यानंतर भाग ३, ५, ६ आणि ७ अन्वये द्यावयाचे आदेश, लेखी देण्यात आले पाहिजेत.

[८]**७३.** (१) ह्या कलमाचा कंडिका २ हीत जी कोणतीही तरतूद करण्यात आली असेल ती खेरीज करुन [९][* * * *] विभाग ३ अन्वये वतनाचा मोबदला निर्दिष्ट करण्यासंबंधी किंवा [९][* * * *] विभाग ५ अन्वये वहिवाटदारांना त्यांचे पारिश्रमिक नेमून देण्यासंबंधी किंवा [९][* * * *] विभाग ६ अन्वये चाकरीच्या वतनासंबंधी रिवाज ठरविण्याबाबत आणि कुटुंबांचे प्रमुख किंवा प्रातिनिधिक वतनदार म्हणून कोणत्या इसमाची नोंदणी करण्यांत यावी यासंबंधी किंवा [९][* * * *] विभाग ७ अन्वये चाकरीची मुदत ठरविण्यासंबंधी द्यावयाचा आदेश, तपासणीच्या कामाबाबत लेखी नोंद केल्यावाचून आणि दाव्याची बाजू मांडण्याची आणि पुरावा हजर करण्याची योग्य संधी दिल्यावाचून देता कमा नये.

---

१ कलमे ६९ व ७१ च्या त्या त्या भागापूरत्या निरसनांसंबंधी सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ पहा.

२ मुंबई वंशपरंपरागत पद (सुधारणा) अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ५) याच्या कलम १४ द्वारे कलम ७० दाखल करण्यात आले.

३ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे 'प्रातांच्या प्रयोजनांसाठी बादशहाची मालमत्ता' या मजकुराऐवजी 'सरकारची मालमत्ता' हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ विधी अनुकूलन आदेश १९५० द्वारे 'प्रांताच्या प्रयोजनांसाठी बादशहा' या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

५ मुंबई विकेंद्रिकरण अधिनियम, १९१५ (१९१५ चा मुंबई ३) याच्या कलम२ व अनुसूची एक द्वारे 'कलेक्टर' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ विधी अनुकूलन आदेश १९५० द्वारे 'बादशहा' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७ केंद्रीय अधिनियम.

८ कलम ७३ च्या त्या त्या भागापूरत्या निरसनांसंबंधी सन १८८७ चा मंबई अधिनियम क्रमांक ६ पहा.

९ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम,१८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ब द्वारे 'ह्या अधिनियमाच्या' हा मजकूर निरसित करण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) चे परिशिष्ट म्हणून छापण्यात आला आहे.

अशा चौकशीसंबंधीच्या प्रत्येक कामांत, आणि [१][* * * *] कलम ५८ अन्वये पदावरून दूर करण्याच्या बाबतीत, कलेक्टरने किंवा इतर अधिकाऱ्याने त्याचा निर्णय, त्या बाबतच्या त्याच्या कारणांसह स्वत:च्या हस्ताक्षरांत लिहिला पाहिजे.

सन १८६६ पासून दिलेले विवक्षित निर्णय नवीन, चौकशी न करता स्वीकारणे.

(२) [२][[३] [राज्य] सरकार] अन्यथा निर्दिष्ट करील ते खेरीज करुन, चौकशीची लेखी नोंद करून आणि दाव्याची बाजू मांडण्याची आणि पुरावा हजर करण्याची योग्य संधी देऊन जे निर्णय सन १८६६ नंतर दिले असतील व जे, जिल्हाधिकाऱ्याने किंवा साहाय्यक कलेक्टरने किंवा प्रतिकलेक्टरने त्यांच्या कारणासहित, स्वहस्ताक्षरात नोंदले असतील असे निर्णय [४][ह्या अधिनियमाच्या] उपबंधांशी विसंगत नसतील तेथवर, [५][* * * *] कलम ६७ अन्वये आवश्यक असलेले नोंदणी पुस्तक तयार करण्याच्या कारणाकरिता, ह्या अधिनियमान्वये करावयाच्या नवीन तपासणीऐवजी स्वीकारले पाहिजेत उक्त नोंदणी पुस्तकासाठी आवश्यक असणारा कोणताही तपशील, वरील प्रकारच्या कोणत्याही निर्णयात नोंदलेला नसेल परंतु तो अशा निर्णयासंबंधांत घेतलेल्या साक्षीपुराव्यांबाबत असेल तर तो, नोंदणीपुस्तक पुरे करण्यासाठी, नवीन तपासणी करण्याऐवजी अशा साक्षीपुराव्यांतून घेण्याचा अधिकार आहे. पुराव्यातून मिळण्याजोगा नसेल असा तपशील, कलेक्टरांना आवश्यक वाटेल अशा आणखी तपासणींतून मिळविला पाहिजे.

कलेक्टरच्या कामकाजावर नियंत्रण.

**७४.** कलेक्टरच्या कामकाजावर, [६][कमिशनरचे व ] [७][[३]राज्य] सरकारचे] सामान्य नियंत्रण असेल.

मामलतदारास विभाग १० अन्वये चौकशी करण्याचा अधिकार आहे.

**७५.** कलेक्टरास, [८][कलम ६४, पोट-कलम (२) अन्वये मामलतदार किंवा महालकरी यांना ज्या बाबींसंबंधी अधिकार सोपवून दिले असतील त्या बाबीखेरीजकरून,] त्यांना [१][* * * *] विभाग १० अन्वये जी कोणतीही चौकशी करणे आवश्यक असेल ती करावयास सांगण्याचा अधिकार आहे, परंतु त्यावरील निर्णय कलेक्टरने दिला पाहिजे.

विशेष तरतूद केली असेल ती खेरीज-करून, इतर बाबतींत अपील दाखल न होणे.

**७६.** [१][* * * *] कलम ६४, कंडिका (ई) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशावर, अखेरचा आदेश देण्यापूर्वी, अपील करता येणार नाही किंवा [१][* * * *] कलम ६७, कंडिका (ब), (क), (ड) आणि (ई) यांन्वये निविष्ट केलेल्या कोणत्याही गोष्टीबाबतच्या आदेशावर, जर अशा आदेशाचा परिणाम, [७][[२][राज्य] सरकारच्या] आदेशान्वये किंवा विधीनुसार ठेवण्यात आलेल्या चालू-नोंदणी पुस्तकात ज्या गोष्टी पूर्वीच नोंदल्या आहेत त्याच नोंदण्यापुरता मर्यादित असेल, तर अपील करता येणार नाही.

---

१ मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसुची ब द्वारे 'या अधिनियमाच्या' हा मजकूर निरसीत करण्यात आला. ही अनुसुची मुंबईचा सर्वसधारण परिभाषा अधिनियम १९०४ (१९०४ चा मुंबई १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आला आहे.

२ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशाद्वारे 'गव्हर्नर इन कौन्सींल' या मजकुराऐवजी 'प्रांतिक सरकार' हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतिक' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) द्वारे हा मजकूर रद्द करण्यात आला आणि सुधारणा अधिनियम, १८९५ (१८९५ चा १६) द्वारे पुन्हा समाविष्ट करण्यात आला.

५ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) द्वारे 'त्यांच्या' हा मजकूर रद्द करण्यात आला. ही अनुसूची मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) चे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

६ सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३ अनुसूची याद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

७ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे 'गव्हर्नमेंट' या मजकुराऐवजी 'प्रांतिक सरकार' हा मजकूर दाखल करण्यात आला.

८ सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**७७.** या ठिकाणी पूर्वी जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून, कलेक्टरने, किंवा सहाय्यक कलेक्टरने, किंवा प्रतिकलेक्टरने लेखी नोंद केलेल्या चौकशीवर [१][* * * *] [२][किंवा ६४, पोट-कलम (२) अन्वये सोपवून दिलेले अधिकार चालविणाऱ्या मामलतदार किंवा महालकरी यांनी दिलेल्या प्रत्येक निर्णयावर] फक्त एकच अपील करता येईल. अपिले.

असे अपील, सहाय्यक कलेक्टर किंवा प्रतिकलेक्टर [१][* * *] [२][किंवा मामलतदार, किंवा महालकरी] यांच्या निर्णयाविरुद्व असेल तर, कलेक्टरकडे केले पाहिजे आणि ज्या आदेशावर अपील असेल तो आदेश दिल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत करण्यात आले पाहिजे.

असे अपील, कलेक्टराच्या निर्णयाविरुद्ध असेल तर ते [३][* * *] [४][कमिश्नरकडे] केले पाहिजे आणि ते, ज्या आदेशाविरुद्ध करावयाचे असेल त्या आदेशाच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत करण्यात आले पाहिजे.

वरील मुदतीची मोजणी करताना, ज्या आदेशावर किंवा निर्णयावर अपील असेल त्या आदेशाची किंवा निर्णयाची प्रत तयार करण्यास जो कालावधी लागेल तो वगळण्यात आला पाहिजे.

**७८.** अपिलाच्या प्रत्येक विनंती अर्जासोबत ज्या आदेशावर किंवा निर्णयावर अपील असेल त्या आदेशाची किंवा निर्णयाची प्रत असली पाहिजे. आणि ज्या निर्णयावर अपील असेल त्या निर्णयाच्या निर्दोषतेबाबत हरकत घेण्यास किंवा ज्या आदेशावर अपील असेल त्यात हस्तक्षेप करण्यात पुरेसे कारण नाही. असे ज्याच्याकडे अपिलाचा विनंती अर्ज करण्यात आला असेल त्या अधिकाऱ्यास पाहणीनंतर दिसून येईल तर, ते अपील नाकारणे हे त्याच्या अधिकारात असेल. अपिला संबंधीच्या विनंती अर्जासोबत आदेशाची प्रत असावी. अपील संक्षिप्तरीत्या चौकशी करुन नाकारण्याचा अधिकार.

**७९.** दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या वैधतेबद्दल किंवा औचित्याबद्दल स्वतःची खात्री करून घेण्याकरिता [५][[६] राज्य] सरकारास] कोणत्याही अधिकाऱ्याच्या कामकाजाच्या दफ्तराची मागणी करुन तें तपासण्याचा अधिकार आहे, आणि तसेच तो आदेश फिरविण्याचा किंवा त्यात सुधारणा करण्याचा किंवा योग्य वाटल्यास नवीन चौकशीचा आदेश देण्याचा अधिकार आहे. कामकाज मागविण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे.

[७][राज्य सरकारला या कलमान्वयेच्या आपल्या अधिकारापैकी सर्व किंवा कोणतेही अधिकार कोणत्याही कमिशनराकडे सोपविण्याचा अधिकार आहे आणि अशा कमिशनरने त्यानंतर आपल्या अधिकारक्षेत्राच्या स्थानिक सीमांत या कलमान्वयेच्या राज्य सरकारच्या फेरतपासणी विषयक अधिकारास आणि राज्य सरकारला लादणे योग्य वाटेल त्या कोणत्याही निर्बंधास अधीन राहून असे अधिकार चालविले पाहिजेत.]

**८०.** ह्या अधिनियमाअन्वये द्यावयाची नोटीस, त्याबाबत ज्या कोणत्याही इसमाने उपाययोजना करणे आवश्यक असेल त्यास ती करता यावी म्हणून निदान सात दिवस अगोदर गावाच्या चावडीच्या किंवा गावातील इतर सार्वजनिक जागेच्या भिंतीवर लेखी लावली म्हणजे ती बजाविण्यात आली असे समजले पाहिजे. नोटीस कशी बजावावी.

---

१ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३), अनुसूची 'ब' द्वारे 'या अधिनियमाच्या' हा मजकूर निरसित करण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (सन १९०४ चा मुंबई १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली आहे.

२ सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ सुधारणा अधिनियम, १८५८ (१८९५ चा १६) द्वारे 'महसूल' हा मजकूर वगळण्यात आला.

४ सन १९८५ चा मुंबई क्रमांक ८ याच्या कलम ३, अनुसूचीद्वारे 'राज्य सरकार' या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

५ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे ''गव्हर्नमेंट'' या मजकुराऐवजी ''प्रांतिक सरकार'' हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ विधी अनुकूलन आदेश १९५० याद्वारे ''प्रांतिक'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७ सन १९५८ चा मुंबई क्रमांक ८ याच्या कलम ३, अनुसूचीद्वारे हा परिच्छेद जादा दाखल करण्यात आला.

वसुली कशी करावी.

**८१.** जमिनीचे उत्पन्न, आकारणी, उपलब्धी किंवा शास्ती याबाबतची सर्व वसुली, त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या विधित जमीन महसूल वसूल करण्यासंबंधी ज्या तरतूदी असतील त्याचप्रमाणे वसूल करण्याचा अधिकार आहे.

[२][राज्य] सरकारने नियम बनविणे.

**८२.** ज्याबाबत स्पष्टपणे तरतूद केलेली नाही अशा गोष्टींबाबत [१][[२] [राज्य] सरकारच्या] अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाकरिता, ह्या अधिनियमाशी विसंगत नसतील असे नियम बनविण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे, आणि तसेच असे नियम वेळीवेळी सुधारण्याचा किंवा रद्द करण्याचाही त्यास अधिकार आहे.

वंशपरंपरागत अधिकाऱ्यांची कर्तव्ये राज्य सरकारने ठरविणे.

**८३.** [३][* * * *] कलम १८ मध्ये अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून, कोणत्याही वंशपरंपरागत पदासंबंधीची कर्तव्य कोणती याविषयी शंका निर्माण झाल्यास ती कर्तव्य ठरविण्याचा [१][[२] [राज्य] सरकारास] अधिकार आहे.

विशेष अधिकाऱ्यांना अधिकार देणे.

**८४.** ह्या अधिनियमान्वये जे अधिकार आणि कर्तव्ये [४][कमिशनरने किंवा] कलेक्टरने करणे आवश्यक आहे ते सर्व अधिकार आणि कर्तव्य किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार आणि कोणतीही कर्तव्ये हीं, त्या कारणाकरिता खास निवडलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास [५][किंवा, कोणत्याही दुमाला गावाचा संबंध असेल तितक्यापुरते, अशा गावाच्या धारकाकडे किंवा धारकांपैकी कोणत्याही धारकाकडे किंवा अशा गावाच्या धारकाच्या कोणत्याही अभिकर्त्याकडे] वेळोवेळी प्रदान करण्याचा अधिकार आहे, आणि [१][[२] [राज्य] सरकारला,] कोणताही मामलतदार किंवा महालकरी यांना वंशपरंपरागत गावाच्या अधिकाऱ्यांस पराकाष्ठा दोन रुपयाहून अधिक नाही इतका दंड करण्याचा अधिकार देता येईल.

[६][ह्या अधिनियमात निर्दिष्ट करण्यात आलेले अधिकार व कर्तव्ये याव्यतिरिक्त [१][[२] [राज्य] सरकारास] ज्या कोणत्याही शर्ती वेळोवेळी विहित करणे योग्य वाटेल त्या शर्तीस अधीन राहून, ह्या कलमान्वये प्रदान केलेले अधिकार चालविले पाहिजेत व कर्तव्य पार पाडली पाहिजेत, आणि [१][[२] [राज्य सरकारला] ह्या कलमान्वये अधिकार आणि कर्तव्य प्रदान करण्यासंबंधीचा कोणताही आदेश, कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार आहे.]

---

१ भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशाद्वारे 'गव्हर्नर इन कौन्सील' या मजकुराऐवजी 'प्रांतिक सरकार' हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतिक' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम,१८८६ (१८८६ चा मुंबई ३), अनुसूची ब द्वारे 'ह्या अधिनियमाच्या' हा मजकूर रद्द करण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याचे परिशिष्ट म्हणून छापण्यात आले आहे.

४ सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३ अनुसूचीद्वारे हा परिच्छेद जादा दाखल करण्यात आला.

५ मुंबई वंशपरंपरागत (सुधारणा) अधिनियम, १८८६ (१८६६ चा मुंबई ५) याच्या कलम १५ (१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६ मुंबईचा वंशपरंपरागत पद (सुधारणा) अधिनियम,१८८६ (१८८६ चा मुंबई ५), याच्या कलम १५(२) द्वारे हा परिच्छेद जादा दाखल करण्यात आला.

**८५.** ग्राम अधिकाऱ्यांची कर्तव्य आणि अधिकार याबाबत किंवा त्यांच्या गैरवर्तनाबद्दल शिक्षेची तरतूद ज्यात स्पष्ट करण्यात आली असेल असा [१]सन १८६७ चा मुंबई अधिनियम ८, किंवा त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणताही विधी यांना ह्या अधिनियमांतील कोणत्याही मजकुरामुळे बाध येतो असे समजता कामा नये आणि अशा विधिंत [२]सन १८४३ चा अधिनियम ११ या संबंधाने केलेले सर्व उल्लेख हे ह्याच अधिनियमासंबंधी केलेले उल्लेख आहेत असे समजले पाहिजे. ह्या अधिनियमामुळे, सन १८६७ चा मुंबई अधिनियम, ८ यास बाध न येणे.

## अनुसूची

[रद्द केलेले अधिनियम, सन १८७६ चा अधिनियम १२ अन्वये रद्द करण्यात आली.]

---

१ मुंबई ग्राम पोलीस अधिनियम, १८६७.

२ या अधिनियमाच्या कलम २ द्वारे सन १८४३ चा अधिनियम क्रमांक ११ रद्द करण्यात आला.

## अनुसूची दुसरी[१]

कलम ६० मध्ये उल्लेखिलेले अपराध

| | अपराधाचे स्वरूप | दंड संहितेच्या ज्या कलमान्वये शिक्षा होण्याजोगी असेल ती कलमें |
|---|---|---|
| (१) | [२]भारतीय दंड संहितेच्या भाग ६ मध्ये ज्याचा उल्लेख केला असेल असा प्रत्येक अपराध. | १२१, १२१-अ, १२२, १२४, १२४-अ, १२५, १३०. |
| (२) | केलेल्या कोणत्याही अपराधाचा पुरावा नाहीसा करणे किंवा अपराध्याच्या बचावाशी निगडीत अशी अपराधासंबंधी खोटी माहिती देणे, जेव्हा केलेला अपराध मरणाची शिक्षा होण्याजोगा, किंवा जन्मठेपेची शिक्षा किंवा दहा वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा होण्याजोगा असेल तेव्हा. | २०१. |
| (३) | अपराध्यास आश्रय देणे, ज्या अपराधाबद्दल मरण्याची शिक्षा देण्याजोगी असेल, किंवा जन्मठेपेची शिक्षा, किंवा दहा वर्षाची कारावासाची शिक्षा होण्याजोगी असेल असा अपराध करणाऱ्या अपराध्यास आश्रय देणे. | २१२. |
| (४) | जर अपराधाबद्दल मरणाची किंवा जन्मठेपेची किंवा दहा वर्षाच्या कारावासाची शिक्षा होण्याजोगी असेल तर, असा अपराध करणाऱ्या अपराध्याकडून, त्याचा शिक्षेपासून बचाव करण्याकरिता देणगी वगैरे घेणे. | २१३. |
| (५) | जर अपराधाबद्दल मरणाची किंवा जन्मठेपेची किंवा दहा वर्षाच्या कारावासाची शिक्षा होण्याजोगी असेल असा अपराध करणाऱ्या अपराध्यास, तो पळून गेला असता किंवा त्याला पकडण्याविषयी आदेश दिला असतां, त्यास आश्रय देणे. | २१६. |
| [३](६) | चोरांना आणि दरवडेखोरांना आश्रय देणे. | २१६-अ. |

१ मुंबई वंशपरंपरागत पद (सुधारणा) अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ५) याच्या कलम १६ द्वारे ही अनुसूची जादा दाखल करण्यात आली.

२ केंद्रीय अधिनियम.

३ मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १९१० (१९१० चा मुंबई ३) याच्या कलम २ (११) द्वारे ही नोंद जादा दाखल करण्यात आली.

एच ८०२-६,१३०-८.२०१५

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

# महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते